त्रिलोकेकरकृत,

संगीत

# सावित्री नाटक.



केशव भिकाजी ढवळे, बुकसेलर,
माधवबाग–मुंबई.

किंमत ८ आणे.

दक्षिणप्राईज कमिटीनें बक्षिस दिलेलें,

# संगीत सावित्री नाटक.

( गद्यपद्यात्मक )

---


## सोकर बापूजी त्रिलोकेकर,

'संगीत हरिश्चंद्र' इत्यादि नाटकांचे कर्ते

यांनीं केलें.



प्रकाशक,

केशव भिकाजी ढवळे, बुकसेलर.

माधवबाग मुंबई,

मुंबई वैभव छापखान्यांत छापवून प्रसिद्ध केलें.

सन १९२३,

सुधारून वाढविलेली आवृत्ति ४ थी.

किंमत ८ आणे.

मुद्रकः-रा. चिंतामण सखाराम देवळे, मुंबई वैभव प्रेस,
सँढर्स्ट रोड, गिरगांव-मुंबई.

प्रकाशकः-केशव भिकाजी ढवळे बुकसेलर
माधवबाग-मुंबई.

( सन १८६७ चा आक्ट २५ प्रमाणें नोंदून प्रयोगादि
सर्व हक्क प्रकाशकानें स्वाधीन ठेविले आहेत. )

# प्रस्तावना.

श्रीमहाभारताच्या व सुभाषिताच्या आधारें म्यां रचिलेल्या संगीत सावित्री नाटकाची ही चौथीआवृत्ति होय. प्रसिद्ध केरळकोकिळाच्या विद्वान् कर्त्यांनीं या नाटकाच्या प्रथमावृत्तीवर केलेल्या टीकेकडे लक्ष देऊन व त्यांनीं केलेल्या सूचनांबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार मानून या आवृत्तींत योग्य सुधारणा केली आहे. टीकाकारांनीं ग्रंथकर्त्यांचे खरे दोष दाखवून दिल्यास त्यांचे आभार न मानतां वृथाभिमानें आपल्याच घमंडींत राहून उगाच दुराग्रहानें आपलें मन विकल्पित करून घेतल्यास कल्पाचे कल्प गेले तरी अल्पस्वल्पही ग्रंथांत सुधारणा होण्याची आशा बाळगणें नकोच हें उघड आहे. मराठी भाषेंत चांगले चांगले ग्रंथ निपजावे अशा स्तुत्य हेतूनें केरळकोकिळकार आज एकसारखे वीस वर्षें झालीं आपल्याकडून प्रयत्न करीत आहेत याबद्दलची केरळकोकिळांत पुस्तक

परिक्षेच्या सदराखालीं विविध विषयांवर आलेले यथा योग्य खुबीदार, चटकदार व निःस्पृह टीकारूपी लेख सुरेख साक्ष देतात. असो.

या आवृत्तींत गद्य व पद्य भागांत कोठें कोठें थोडा-बहुत अगत्याचा फेरफार केला आहे व कांहीं जास्त गायनेंही घातलीं आहेत. हें प्रयोगकार व रसिकजन यांच्या ध्यानांत येईलच.

सामान्य मनुष्याची कृति कधींही अगदीं निर्दोष नसावयाचीच. या दृष्टीनें पहातां या माझ्या कृतींत कांहींना कांहीं तरी दोष राहिले असतीलच. तरी त्या दोषांची क्षमा करून सज्जन व रसिकजन यांनीं गुण तेवढे ग्राह्य करून आपलें मनोरंजन करून घेतल्यास माझ्या श्रमाचें सार्थक झालें असें मी खचित समजेन.

सोकर बापूजी त्रिलोकेकर,

ग्रंथकर्ता.

# दोन शब्द.

महापतिव्रता सावित्रीचें कथानक माहीत नाहीं असे चारही वर्णांतील स्त्रीपुरुष क्वचितच आढळतील. धार्मिकसंबंधानें आणि मनोरंजकपणानें हें आबाल-वृद्धांस मान्य व पसंत झालेलें आहे. हें कोणासही सांगावयास नको.

मार्मिक व प्रसिद्ध कवि व संगीत नलदमयंती आणि संगीत हरिश्चंद्र नाटकांचे कर्ते व मुंबई हाय्-कोर्टांतील इन्टरप्रीटर आणि ट्रान्स्लेटर रा. रा. सोकर बापूजी त्रिलोकेकर हल्लीं पेन्शनर ह्यांनीं हें "संगीत सावित्री नाटक" बरेच वर्षांपूर्वी रचिलें आहे. हें दक्षिणा प्राइझ कमिटीनें पसंत करून योग्य बक्षिस राजमान्य सोकरजी ह्यांस दिलें आहे. ह्या नाटकाचे रंगभूमीवर प्रयोग आज १४।१५ चौदा पंधा वर्षें सारखे होत असतात. मुंबईच्या थिएटरांतून ह्या संगीत सावित्रीचा प्रयोग असला कीं लोकांची फारच गर्दी असते.

ह्यांतील कित्येक पद्यें इतकीं उत्तम बनलीं आहेत कीं तीं कित्येक तरुण स्त्रीपुरुषांच्या अगदीं कंठगत झालीं आहेत.

एकाद्या जुन्या प्रासादिक कवीच्या पद्यांच्या पंक्तींत ह्या आधुनिक कवीच्या पद्यांना या या म्हणून विद्वान् रसिकांनीं आणून बसविलीं आहेत. तसाच ह्यांतील गद्यभागही अलंकृत आहे.

"बघुनि तपोवन" येथपासून तों "वाटे येथुनि निकट पतीच्या" येथपर्यंतचा भाग फारच सुंदर वठला आहे तो पुनः पुनः वाचावासा वाटणें साहजिक आहे.

अगोदर उत्तम सुवर्ण, आणि कुशल कारागिरानें केलेले त्याचे परोपरी अलंकार, सहृदय त्यांची सारखी इच्छा करतील त्यांत नवल तें काय ?

अगोदर हें कथानक मनोरम, त्यांत रा. रा. शोकर बापूजीसारख्या कवीच्या कुशाग्र बुद्धीचें सर्वस्व त्यांत ओतप्रोत भरून राहिलें आहे. मग हें किती म्हणून सुंदर म्हणावें.

रा. त्रिलोकेकर ह्यांनीं ह्या संगीत सावित्री नाटकाच्या पुनः पुनः आवृत्ति छापून प्रसिद्ध करण्याचे हक्क मोठ्या आदरबुद्धीनें आमचे पदरांत टाकले आहेत. प्रयोगकारांनीं आमचे परवानगीनें रंगभूमीवर प्रयोग करावे.

भाग्यशाली आयुष्यमान् आमचे मित्र राजमान्य सोकर बापूजी त्रिलोकेकर ह्यांचे सौजन्याचें स्मरण करून व विनंति करून प्रस्तावनेदाखल हे दोन शब्द पुरे करितों.

प्रकाशक.

श्रीगौरीशंकरतनय प्रसन्न.

# संगित सावित्री नाटक.

## मंगलाचरण.

( सूत्रधार गायक मंडळीसह प्रवेश करितो. )

**सूत्रधार व गायकमंडळी—**

गायन. ध्रुपद. ( राग यमन. )

वंदीं नीलकंठ सांब श्रीचंद्रभाल ॥ ध्रु० ॥ गीतरंगवरा नाट्यनटेशा ॥ दनिदयाघन रंकपाल ॥ वंदीं० ॥ आत्मसंयमना ज्ञानसुरूपा ॥ पूर्णसनातन लोकपाल ॥ वंदीं० ॥ पापसंहरणा मोहबिनाशा ॥ भंग प्रभो भवभ्रंशजाल ॥ वं० ॥

**सूत्रधार**—आतां वरद मूर्तीची स्तुति करूं.

**सू० व गायकमंडळी--**

पद. ( चाल--तो शिवशंकर० )

**नंदकंद मधु मरंदरूपीं पदकमळीं ज्याच्या वसतो ॥ योगीवृंदमिलिंद सदोदित यत्स्थानीं भ्रमें रमतो ॥ भग्न कराया विघ्नगांतें भक्तासाठिं सदा झिजतो ॥ त्या श्रीगौरीतनया आधीं मन्मानससुमनें पुजितों ॥ नंद० ॥**

अहाहा ! ईश्वरस्मरण माझ्या जिवाला किती समाधान देत आहे ?

**अश्वपति**-( आंतून) मित्रा, अरे, माझ्या कार्याची तुला अशी विस्मृति कां बरें व्हावी ?

**सूत्रधार**-( चकित होऊन ). कोण, माझा मित्र राजा अश्वपति ! देवी सावित्रीच्या प्रसादेंकरून त्याला प्राप्त झालेली अति रूपवती व तेजस्वी कन्या सावित्री इला एखादा योग्य वर पाहण्याचें कार्य मजवर त्यानें सोंपविलें आहे त्याची मला विस्मृति झाली असें तो म्हणतो ! अरेरे ! पण मी त्याला जा-

ऊन काय सांगूं ? अनेक प्रयत्न केले परंतु एकही सफल झाला नाहीं. सावित्रीचें अनुपम सौंदर्य व अतुल तेज माहून कोणीही राजपुत्र तिला वरण्याला धजत नाहीं, तेथें माझा काय उपाय ! आतां हें मुख मी माझ्या मित्राला कसें दाखवूं ! ( दुःखी होत्साता एकीकडेस उभा राहतो इतक्यांत नटी प्रवेश करिते )

**नटी**— पद. ( चाल–संया लटक लटक )

**कांहो वदन विरस मदनमोहनराया ॥ गुणीराया ॥ मुदित सतत हृदय व्यथित विकला ऐशी काया ॥ ध्रु० ॥ हौसि सदाची वृत्ति मनाचा काय घडे शिणवाया ॥ १ ॥**

**सूत्रधार**—प्रिये, ज्या दुःखाचा परिहार तुझ्यानें करवणार नाहीं तें दुःख तुला सांगून काय उपयोग !

**नटी**–पण एखाद्यानें आपलं दुःख दुसऱ्याला सांगितलं म्हणजे त्याचं तें कमी होतं हें आपणाला नाहीं का ठाऊक प्राणनाथ ?

**सूत्रधार**—अग, आहे ठाऊक; पण–

**नटी**–हीच का आपली प्रीति ! वारंवार ह्मणत असतां कीं तूं माझ्या गळ्यांतील ताईत ! गळ्यांतील ताईत ! त्याचं हेंच का लक्षण ! मीच मेलं उगीच जाळतें जिवाला ? ( रुसून एका बाजूस उभी रहाते. )

**सूत्रधार**–अग, अशी रुसूं नको. तुझी इच्छाच आहे तर ऐक—

**साकी.**

**दक्ष नृपति जो प्रजारक्षणीं वाहे भार तयेचा ॥**
**घेणें वांटा तद्दुःखाचा प्रजाधर्म हा साचा ॥**
**ह्मणुनी विरस मनीं ॥ सारसनयने प्रियकरणी ॥**

**नटी**–( शांत होऊन ) ह्मण आहे ती खरी कीं, " राजा सुखी तर प्रजा सुखी. " पण ही गोष्ट कोणाला लक्षून सांगतां प्राणनाथ ?

**सूत्रधार**–नाहीं का उमगलं ? अग, तो माझा जिवलग मित्र, राजा अश्वपति—

**नटी**–अश्वपति ! अश्वपतीला काय झालें असावं बरं !

**सूत्रधार**–कांहीं झालें नाहीं पण त्याची ती कन्या सावित्री—

**नटी**–हं हं. समजलं. नाहींका अजून तिला मिळाला नवरा ?

**सूत्रधार**–अग, नवरा मिळणार तो कोठून ! तिला वरतो कोण ! तिच्या तोलाला तोल देणारा कोणी असेल तर ही गोष्ट घडून येईलना !

**नटी**–खरंच. कोणतीही गोष्ट अति झाली ह्मणजे नेहमीं असंच. पहा—

**दिंडी.**

**रामजाया जानकी कोमलांगी ॥**
**रूपवैपुल्यें बंध तयेलागीं ॥**
**महा गर्वें ये मृत्यु रावणाला ॥**
**अतिच दानें पाताल त्या बलीला ॥**

**सूत्रधार**–"अति सर्वत्र वर्जयेत्," हीच गोष्ट अक्षरशः खरी आहे. आणि याच कारणामुळें तिचा लग्नयोग जमत नाहीं.

**नटी**–खरंच ह्मणतां प्राणनाथ. लग्न ह्मटलं ह्मणजे जन्माची गांठ. दूरवर विचार केला पाहिजे. अहो, जिथं कुल आहे तिथं रूप नाहीं; रूप आहे तर गुण नाहींत; गुण आहेत तर धन नाहीं नि; जिथं सर्व कांहीं आहे तिथं इच्छा नाहीं. अशा अडचणीमुळें, जिथं पहावं तिथं, अगबाई ! किती तरी उपवर झालेल्या मुली मोठमोठ्या वाढल्या आहेत आणि निराशेनें अगदीं हिरमुसल्या सारिख्या झाल्या आहेत. काय करावं बिचाऱ्या त्या मुलींनीं नि त्यांच्या आईबापांनीं !

**पद.** ( चा०–काय असें आज्ञा० )

**कन्याधन ही ठेव पराची ॥ नकळे परि ती कवण नराची ॥ ध्रु० ॥ वाहति चिन्ता जननी जनिता ॥ निशिदिनीं तीतें रक्षायाची ॥ १ ॥ संशयजलधीं बुडवि तयांसी ॥ द्यावि कुणा ती परत कुणाची ॥ २ ॥**

**सूत्रधार**–प्रिये, हेच दुःखशर त्या नृपवराच्या अंतःकरणांत निरंतर सलत आहेत.

**नटी**–नि आपणांला नाहींका आपल्या गंगूच्यां लग्नाची काळजी ! पहा ती पोर या चार पांच महिन्यांत, अगबाई, एकाएकीं किती तरी गरगरून वाढली ! आज नवरा मिळेल, उद्यां नवरा मिळेल, ह्या आशेनं कसंही करून इतके दिवस लोटले. पण आतां तर बाई, मी निराशेनं उदास होऊन काळजीनं अगदीं करपून गेलें आहें. सुखाचा घास तोही मेला गोड लागत नाहीं. काय परमेश्वर करील तें खरं ! ( खिन्न होते. )

**सूत्र०**–प्रिये, स्वस्थ ऐस. अंमळ धीर घर. अग-

दिंडी.

**आधिं निर्मी वर मग वधू विधाता ॥**
**व्यर्थ मनिं कां मग वागविसी चिन्ता ॥**
**घडे विधियोगें जाण सर्व कांहीं ॥**
**धरुनि धैर्यातें प्रिये स्वस्थ राहीं ॥**

**नटी**–प्राणनाथ, आपण कितीही सांगितलं तरी चिंतेचं कारण दूर झाल्याशिवाय चित्त मेलं स्वस्थ कोठून होणार.

**सुत्रधार**–( आंत पाहून ) अरे पण, ज्या माझ्या मित्राला मी मुख दाखविण्यास इतका भीत आहें तोच तो पहा, स्त्रीसहवर्तमान येथेंच येत आहे. चला आपण येथून जाऊं.

**नटी**–अरेरे ! चिंतेनें व्याकुल झालेल्या ह्या राजाची केवढी दुर्दशा होऊन गेली आहे ! पहा–पहा–

**साकी.**

**मजसम कृश किति चिंतातापें झालासे हा राणा॥**
**वदनविकलता निद्राभावें जडता ये तच्चरणा ॥**
**चिन्ता बहु खोटी ॥ अनलाहुनिही जी मोठी ॥**

( नटी व सूत्रधार जातात. )

# अंक १ ला.

## प्रवेश पहिला.

स्थल.........................राजमंदिर

( चिंतातुर झालेला राजा अश्वपति स्त्री मालवीसह प्रवेश करितो.

अश्वपति— पद. ( चाल—मन कां चिंता०

**पाहुनि उपवर दुहितेतें ॥ माझें अंतर तळमळतें ॥ ध्रु० ॥ असुनि सुशीला सुंदर बाला ॥ वरिना कोणि तितें ॥ १ ॥ निशिदिनिं चित्ता तपवी चिंता ॥ तनु सखये जळते ॥ २ ॥**

**मालवी**—माझीही दशा, प्राणपति, आपल्या सारखीच झाली आहे. मला तर मुळींच मुलीचं दुःख पहावत नाहीं. अहो, ती शहाणी, समंजस, मर्यादशील म्हणून आपलें हद्गत प्रगट करीत नाहीं. परंतु तिच्या बाह्य आचरणावरून तिच्या मनाची स्थिति दुसऱ्याला कळल्यावांचून का रहाते ! अहो—

दिंडी.

**गोड लागेना अन्न जिला चिन्तें ॥**
**भोग सौख्याचा नावडे जयेतें ॥**
**जिला निद्रा वैरीण जशी भासे ॥**
**हास्यवदनी परि मुख न जिचें हांसे ॥**

**अश्वपति**—वरचिंतनेंकरून तिच्या शरीरावर पांडुरता तरी किती आली आहे प्रिये !

**मालवी**—आज दोन चार दिवस झाले, तिनें तर मुळींच अन्न वर्ज केलें आहे. नि देव देव करीत बसली आहे आतां याचा परिणाम तरी काय होणार ? मला तर बाई फार काळजी लागली आहे.

पद ( चाल—सदाशिव धुंदी० )

**सुचेना कांहीं ॥ विकल मन राही जिवा सुख नाहीं ॥ ध्रु० ॥ असुनी वैभव शचिसम माझें ॥ लाज परी मन वाही ॥ १ ॥ व्यथिता कन्या बघुनी जननी॥दुःख कशी तरि साही ॥२॥**

**अश्वपति**—प्रिये, तूं नको इतकी व्याकूळ होऊं. चला आपण देवघरांत जाऊन तिचें शांतवन करू.

**मालवी**–जशी प्राणनाथाची इच्छा.

[ जातात. ]

## प्रवेश २ रा.

स्थल..................देवघर.

**सावित्री**–( देवीस फुलें वाहतां वाहतां. )

पद. (चाल–नमामि महिषासुर० )

**दयाळे करुणा कर अंबिके॥ तव पदांबुज हरिस-पद्मज ॥ निजमनीं सुरमणी ॥ ऋषिमुनी, चिंतुनी॥निशिदिनीं ॥ रमति शिवमंदारलतिके॥धृ०॥ भाग्यवरदायके ॥ अंबे कुमारिके ॥ भक्तजन-पालके ॥ ईश्वरी, मृडानी, भवानी भ्रामरी ॥ प्रणवरूपिणी, भुवनसुंदरि ॥ मजसि उद्धरिं ॥ ज्ञानपंचककलिके ॥ १ ॥**

पुराणिकबोवा कां बरं अद्याप आले नाहींत ?

**बजा**–ह्मटलं असतां यावेत. विलंब कां झाला असेलं कोण जाणे, पाहून येतों. अरे पण, पहा, तेच येथें येत आहेत. ( पुराणिक प्रवेश करितो. )

**सावित्री**–यावं पुराणिकबोवा, यावं. बजा आसन मांड रे. बसावं या आसनावर.

**पुराणिक**–( पोथीचें पूजन झाल्यावर ) करूं का आतां आरंभ ?

**सा०**–करा बरें.(पुराण झाल्यानंतर पुराणिक जातो. नंतर ) आण रे ती माझी जपमाळ कुठे आहे ती.

**बजा**–खुंटीवर ठेविली होती. नाहीं कां तिथें ? अरे, विसरलों, विसरलों ! हाच पहा घेऊन येतों, ( जाऊन माळ घेऊन येतो व ती सावित्रीस देतो ती घेऊन जप झाल्यानंतर. )

**सावित्री**–( रडत )

**पद.** ( चाल प्रतिकूल होईल० )

**आदिशक्ति अंबे गौरी प्रियकरी शिवाची ॥**
**भक्तचित्तकमलभ्रमरी माय तूं जगाची ॥ध्रु०॥**
**रूप तेज देउनि मजला कांग कष्टवीलें ॥**
**विपिनजन्यकुसुमापरि मी अर्थहीन झालें ॥**
**कोणिही वरीना मजला काय पाप केलें ॥**
**व्यर्थ कशी जन्मा आलें लाज तुला त्याची॥१॥**

आई, जगदंबे, आतां तुला माझी करुणा तरी केव्हां येणार! अग, हें रूपतरी तूं मला कशासाठीं दिलंस! मला कुरूप कां केली नाहींस! आतां मी अशीच का जन्मभर अविवाहित राहणार! आई आतां मी काय करूं!

( अश्वपति व मालवी व सावित्रीची सखी चंद्रकला प्रवेश करितात. )

**अश्वपति—** पद. ( चाल—सोड सोड० )

**धाय धाय रडासि कांग सांग लाडके ॥**
**गांजितसे अधम तुला कवण कन्यके ॥धृ० ॥**
**जलमय तव बघुनि नयन ॥ खिन्न म्लान दीन वदन ॥ थरथरथर कंपित तन ॥ अश्रुबिंदुसांद्रवसन ॥ मग्न हृदय होय सुते दुःखसायके ॥ १ ॥**

**सावित्री**—( रडत ) आईबापांना दुःखांत टाकणारी माझ्यासारखी मुलगी जन्मली तरी कशाला!

**अश्वपति**—मुली तूं इतकी उदास होऊं नको. धीर धरशील तर सर्व कांहीं ठीक होईल.

**मालवी**—अग, नवरा आज मिळाला नाहीं तर उद्यां मिळेल, नवरा मिळाल्यावांचून का राहतो. तूं उगीच आपल्या जिवाला कष्टी कां करितेस!

**चं०**—अहो ती सर्व गोष्ट खरी पण—

**पद.**

( कालिंगडा. चाल—मुझे आस लगि० )

**जन सारे निंदा करितिल कीं ॥ ध्रु० ॥**
**त्रिविध असे जग ठाउक सकलां ॥**
**अविवाहित जरि राहे अबला ॥**
**लाविती लांछन भलतें तिजला ॥**
**चर्चा होइल जनलोकीं ॥ १ ॥**

**अश्वपति**—मीही, याचमुळें जगतांत निंदेस पात्र होणार आहें. कारण, यथाकालीं कन्येचें दान न करणारा पिता व पिता मरण पावला असतां मातेचें रक्षण न करणारा पुत्र निंद्य होत. मुली, तूं उपवर झाली आहेस. तुला सुवर्णप्रतिमेसारखी तेजःपुंज पाहून सर्व राजपुत्र ही देवकन्याच आहे असें मानून कोणीही वरीत नाहींत तर तूं तरी आतां राजतपो-

वनांत जा आणि एखादा योग्य गुणवान् व तपश्चर्येच्या पुण्येंकरून तुझ्यापेक्षां अधिक तेजस्वी अशा राजपुत्रास आपल्याकरितां स्वतः भर्ता पहा. नंतर मी त्याचा विचार करून त्यास तुला देईन.

मा०—माझ्याही मनांत हेंच वागत होतें.

सा०—ताता मी आपली आज्ञा मान्य करितें.

अश्वपति—कोण आहे रे तिकडे ? मुख्य मंत्र्याला बोलावून आण.

सेवक—( प्रवेश करून ) महाराज तेच पहा येथें येत आहेत.

मुख्य मंत्री—( प्रवेश करून ) काय आज्ञा आहे महाराज ?

अश्व० साकी.

कार्य करा मम जेविं साधिलें रामकार्य हनुमंतें॥
राजतपोवनमहानिधीतें मिळउनिया गुणसरिते
सत्वर परतुनि या ॥ यश निजसंगें घेउनियां ॥

# अंक २ रा.

## प्रवेश पहिला.

स्थल.........राजतपोवनाचा मार्ग.

**सावि०**—चार घटिका मात्र रात्र उरली आहे. प्रवासामुळें झालेल्या श्रमाला जरा विश्रांति असावी नाहीं बरं ?

**मंत्री**—आपली काय आज्ञा आहे ? आपल्या इच्छेप्रमाणें वर्तन करण्यास मी सिद्ध आहें.

**सा०**—त्या पलिकडच्या सुंदर प्रदेशांत शिबिरें उभीं करून त्यांत चार घटिका विश्रांति घेऊन उद्यांक राजतपोवनांत जावें असें मला वाटतें. तुमची काय इच्छा आहे ?

**मंत्री**—आज माझा मोठाच सत्कार झाला. चलावें मी सर्व सिद्धता सत्वर करवितों.

## प्रवेश २ रा.

स्थल...............राजतपोवन.

### पद.

सा०– ( चाल–धड धड धड दावाग्नि चेतला. )
बघुनि तपोवन राज–ऋषीचें हर्ष मनीं वाटे भारी ॥ होति शकुन मज नाना परिंचे प्रिय सखये मंगलकारी ॥ वाटे मजसी माझी मनीषा होइल परिपूरित सारी ॥ मिळुनि वनीं या इष्ट औषधी हृद्रोगा शांतविणारी ॥ ऐक सखे हा रव पक्षांचा अस्तु अस्तु सूचनकारी ॥ मार्ग दिसों लागला प्रियाचा दिसति प्रसन्न दिशा चारी ॥

चंद्रकला–आणि, सखे, हें वन तरी किती प्रफुल्लित दिसत आहे !

### पद.

( चाल–काय वसंतीं उपवनशोभा० )
किति रमवी मन वनशोभा ही श्रम माझे विसरें ॥ सखे गे ॥ वाटे मज हें रची विरंची नंदनवन दुसरें ॥ सखे गे ॥ पुष्पजन्य किति पवनद्वारें गंध

मधुर पसरे ॥ सखे गे ॥ किति गुंजारव करि मधु लुटण्या अलिगण जो उत्तरे ॥ सखे गे ॥ बघ इकडे हें विमल सरोवर शोभित कमलभरें ॥ सखे गे ॥ वनशोभा ही बघतां माझी हौस खरी न पुरे ॥ सखे गे ॥

आणखी— दिंडी.

किति शोभे हा रानमोगरा गे ॥
तेंवि चंपक मालती केवडा गे ॥
गंधमाधुर्यें मोद मनीं जागे ॥
भुजंगवेणी तव सजविं फुले या गे ॥

सावि०—सखे तुझें हें वर्तन मला किती तरी आनंद देत आहे !

अग... दिंडी.

पुष्प दावी त्वत्प्रेम सख साचा ॥
शकुन वाटे हा इष्ट लाभण्याचा ॥
वृद्धि पावे शुक्लेंदुकला जैसी ॥
प्रीति वाढो तव चंद्रकळे तैसी ॥

( इतक्यांत सत्यवान् मित्रासह प्रवेश करितो. )

**सत्यवान**—अहाहा ! या सुस्वर ध्वनीनें मला अगदीं गुंगवून टाकिलें आहे. हा ध्वनि कोठून बरं आला असावा ! अरे—

**पद.**

( चाल—तोम् तननन् वाजवि वेणू. )

**या मधुतर सुस्वर नादें ॥ वन अवघें अंबर कोंदें ॥ या स्वरमाधुर्यें ॥ गुंगुनि त्यागिति जलसेवन मृग ॥ डोलति किति तरि फणींद्र मोदें ॥ धृ० ॥ जैसे रंगति जन प्रीतितरंगें ॥ आनंदति सुगीतसंगें ॥ दुःखीं विस्मृति तद्योगें ॥ नादब्रह्मीं रमति सुर सदा भोगी त्यागी गायनछंदें ॥ १ ॥**

सा०—सखे, गायनकलेंत इतका कुशल, तेजानं जसा सूर्य, नि रूपानं केवळ मदनच असा हा पुरुष कोण बरं असावा ! याला पाहून किनाई माझ्या बाई. मनाची स्थिति कांहीं विलक्षणच होऊन गेली आहे. या मनोहर पुरुषाच्या मुखचंद्रोदयदर्शनानं माझ्या हृदयसरोवरांत प्रेमकमळें प्रफुल्लित होऊं लागलीं आ-

हेत. सखे, आपण अशा इथंच उभ्या राहून तो काय काय करितो तें जरा पाहूं. तूं रहा इथं जरा आड उभी. ( दोघीही कांहीं अंतरावर एका बाजूस आड उभ्या राहतात. )

**सत्य०**–मित्रा, तुला कांहीं पाहवेसें वाटतें का ?

**मित्र०**–हो. पाहण्यासारखें असलें तर.

**सत्य०**–अरे, ती पहा, त्या आम्रवृक्षाला प्रफुल्लित लतिकेसारखी शोभविणारी सुंदरी, अहाहा ! केवळ लावण्याची मूर्त्ति !

**मित्र०**–पण तुला तिशीं काय करायाचें आहे बाबा ! तूं आपला चल, कंदमुळें आणायाला.

**सत्य०**–जरा थांब रे. मला नीट पाहूं दे तर खरी.

**मित्र०**–अरे, पण ती आपणांकडे इच्छादृष्टींनें एक सारखी पाहत आहे. ती कोण असावी बरं ?

**सत्य०**–तिच्या स्वरूपाचें वर्णन करणें माझ्या शक्तिपलिकडे आहे. अहाहा ?

**पद. ( गज्जल. )**

**कुसुमचापें युवति न्हाली ॥ रचित भासे वनीं आली ॥ धृ० ॥ सुवासें जिच्या गमे मातें ॥ सर्वे आणी वसंतातें ॥ अतुल तेजें रवी झांकी ॥ तप तेजा तमीं टाकी ॥ लपवि रूपें शशी कोटी ॥ मला मोहार्णवीं लोटी ॥ १ ॥**

**मित्र**—( स्वगत ) एकून राजश्री तिच्या मोहजालांत सांपडलेसे दिसतात ! पाहवं पुढें काय होतें तें !

**सा०**—याची वृत्ति विषयसुखापासून पराङ्मुख न झालेलीशी दिसते ! हीच वेळ आतां आपली पुढें जाण्याची. सखे, तूं हो पुढें.

**चंद्र०**—आणि तूंच पुढें झालीस तर त्यांत कमी काय होणार आहे ?

**सावि०**—अग, मी झालें असतें पुढें. पण परक्या पुरुषाबरोबर भाषणं करण्याचा मला सहवास नसल्यामुळें, मला बाई, जरा लाज वाटते. तशांत, मी पडलें भोळसर आणि तूं कशी मोठी चतुर, धूर्त, सुतानें स्वर्गाला जाणारी, म्हणून सखे तूं किनाई सर्व

कांहीं खुबीनें विचारशील. पण माझें हृद्गत तुला कळलेंना सखे ?

**चंद्र०**—काम काढून घेण्याची सखे तुला युक्ति बरीच साधली आहे ग. पण मजसमागमें तर तूं येशीलना !

**सावि०**—हो, मी आहेंच तुझ्या पाठीशीं !

**चंद्र०**—( पुढें जाऊन ) महाराज, आपणाला पाहून माझ्या मनांत नाना प्रकारचे विचार येऊं लागले आहेत. संशयनिवृत्ति करणें आपणांकडे आहे.

**सत्य०**—असा कोणता संशय आहे तो ?

**चंद्र०**—त्याविषयीं आपणाला कांहीं विचारलें असतां त्याचा राग तर येणार नाहींना ?

**सत्य०**—त्यांत राग कशाचा, उलटा संतोषच होईल. खुशाल विचारा.

**चंद्र०**—

पद. ( चाल—दिलभ्रमनमे बीचू० )

**सौंदर्यसुमांच्या गंध विपिनिं दवडाया ॥**
**कां धरिलेंसें मनिं सांगा मजला आर्या ॥**

तारुण्यभराला उग्र तपें जाळाया ॥
गुरु कोण मिळाला ऐसें उपदेशाया ॥

( चाल. )

प्रसवसी कोण रत्ना या माउली ॥
प्रतिमा ही होय कुणाची चांगुली ॥
अतुरता वृत्त परिसाया जागली ॥
निजवृत्त कथुनियां देणें शान्ति मना या ॥
नाचि होणें शंकित नांव गोड प्रगटाया ॥ १ ॥

सावि०–(स्वगत)थोडक्यांतच पण सखीनें माझ्या मनांतलं सर्व कांहीं किती तरी खुबीनं विचारलं !

सत्य०–व्यावहारिक नांवाचा उच्चार केल्यानें आयुष्य क्षीण होतें असें म्यां धर्मशास्त्रांत अवलोकन केल्याचें मला आठवतें.

सावि०–( स्वगत ) रूपवान् असून शास्त्रपरायण ! हा जर क्षत्रिय असेल तर मग काय सोन्याहून पिवळं !

मित्र०–या माझ्या मित्राला लोक सत्यवान् असें ह्मणतात.

**सावि०**-(स्वगत) अहाहा ! नांव तरी किती गोड ! नांवाप्रमाणें करणी असल्यास झालंच माझं काम.

**चंद्र०**-महाराज, आपलं नांव तर कळलं. पण आपलं गांव कोणतं असावं बरं ?

**सत्य०**-सांप्रत आमच्या सारिख्याचें गांव सर्व पृथ्वी आहे. कोणत्या गांवचें ह्मणून नांव सांगूं !

**चंद्र०**-बरं पण आपले आईबाप कोण ?

**मित्र०**तुह्मांला त्याची एवढी पंचाईत पाहिजे ती कशाला ! याशीं काय तुह्मांला लग्न लावावयाचें आहे कीं इतकें खोदखोदून पुसतां ? लोक ह्मणतात कीं बायकांची जात चेंगट ती खरी गोष्ट, यांत संशय नाहीं. अरे, तूं चल बाबा, चल येथून एकदाचा. या अशा एकसारख्या चार घटिका बोलत उभ्या राहतील आणि पुरे पुरे करून सोडतील.

**सत्य०**-तुझा रे कां मध्यें गोंधळ ! ऐका माझ्या पूज्य मातापितरांचीं नांवें.

साकी.

**माय सुशीला शैब्या साध्वी अनुसूयेसम जाणा ॥**
**द्युमत्सेन मम तात धनुर्धर शाल्वदेशिंचा राणा ॥**
**दैवत मम जननी ॥ नाहीं अन्य मनीं ध्यानीं ॥**

**सावि०**–( स्वगत ) आतां कांहींच संशय उरला नाहीं, विशाल क्षत्रिय कुळांत जन्मलेला, रूप, यौवन, धर्मशास्त्र, सद्गुणसंपन्न व मातृभक्तिपरायण, असा हा पति मला प्राप्त झाला असतां मी मोठ्या भाग्याचीच ! पण हें अमूल्य रत्न मला कसें लाभणार ! असो. पण मना तूं इतकें उदास कां ?

पद. ( कलिंगडा. )

**व्याकुळ कां होसी ॥ मना तूं ॥ ध्रु० ॥**
**लाभे इच्छित जाण तुला तें ॥**
**धीर जरी धरिसी ॥ मना तूं० ॥**

**चंद्र०**–मग असा हा दीन वेष कां ?

**सत्य०**–दान, मान, अपमान इत्यादि गोष्टी व्यवहारांत गुप्त ठेवाव्या असें म्हटलें आहे म्हणून आमच्या स्थितीचें कारण उघड करतां येत नाहीं. पण हा

दीन वेष वस्तुतः दीन नाहीं परंतु माझ्या मनाचें समाधान दर्शविणारा यथोचित प्रतिष्ठित वेष आहे.

**सावि०**–( स्वगत ) हें ऐकून मला असें वाटतें कीं हे सांप्रत महत्संकटांत आहेत. तेणेंकरून मला फार दुःख होतें. पण समाधानवृत्ति धारण करून कालक्रमण करिताहेत म्हणून दुःखांत देखील मोठा आनंद वाटतो. ( उघड ) सखे, चल आतां मुख्य मंत्री आपली वाट पहात असतील.

( जाऊं लागतात. )

**मित्र**–वाहवा ! सर्व कांहीं विचारून घेतलें आणि चालल्या आपल्या आम्हांला संशयसागरांत गचकळ्या खायाला लावून. तुम्ही कोण आहां हें नको का आम्हांला कळायला ?

**चंद्र०**–( मागें परतून ) हो, पण तें मी सांगितल्यावांचून का जाणार आहें !

**साकी.**

**प्रसवे कन्यारत्नातें या अश्वपतीनृपजाया ॥**
**तत्सुवर्तनें स्त्रीजातीतें सुपथ जणुं दावाया ॥**

**परम सुशीला ही नृपबाला जैसी प्रतिसावित्री ॥**
**तेजें दिपती नृपति न वरिती नाम इचें सावित्री ॥**

**मित्र**—केवढा तरी बलवत्तर दैवयोग हा ?

**सत्य०**—( चंद्रकलेस ) पण आपण कोण ?

**सावि०**—( गालांत हंसून सत्यवानाकडे प्रेमदृष्टीनें अवलोकन करून अति नम्रतेनें त्यांस ) ही माझी प्रिय सखी चंद्रकला.

**सत्य०**—अहाहा ! एक रति व दुसरी रोहिणी. कोण जाणे कोणाच्या प्राक्तनीं असतील या !

( सत्यवान् मित्रासह जातो. )

**सावि०**—सखे, आतां मी काय करूं ?

**पद.**

( चाल—मुरलियानें छीन लिया० )

**चोरियेलें चित्तचोरें माझें मन ॥ माझें मन, माझें मन, माझें मन गे ॥ चोरि० ॥ होय कठोर अनंगसुमचाप गे ॥ प्रीतिशर ऊरिं लागे ॥ झणणण, झणणण, झणणण गे ॥ चोरियेलें० ॥**

## प्रवेश तिसरा.

स्थल......अरण्याचा मार्ग.

**मित्र**–मित्रा, अरे तूं इतका ज्ञानी व विवेकी असतां त्या राजकन्येच्या मोहपाशांत कसा सांपडलास ?

**सत्य०**–तुला त्याचें आश्चर्य तें काय वाटलें! अरे, प्रेमबंधनाइतकें दुसरें कोणतेंही दृढ बंधन नाहीं. पहा, भ्रमर हा लांकडाचीं लांकडें फोडून काढितो, पण कमलाच्या गाभ्यांत त्याचा कांहींच जोर चालत नाहीं. मित्रा–

**पद. ( तिदित सकल० )**

**नयन दंग हृदयिं रंग बघुनि सुंदरी ॥**
**परि अनंग करि दुभंग हृदय निजशरीं ॥धृ०॥**
**पीतवर्ण तनु सुवर्ण नीट नेटकी ॥**
**लक्षुनि ती कंटकमय कनक केतकी ॥**
**विपिन धरी बघुनि करी हंसगती कीं ॥**
**कोकिलतनु कृष्णवर्ण होय सुस्वरीं ॥ १ ॥**
**चपला ती चपलाक्षी बघुनि लाजली ॥**

**लपुनि सतत घनवेष्टित गगनिं राहिली ॥**
**सुंदर मुख कमलाधरमधुरसांतली ॥**
**अलिपरि रुचि लुटिल तोचि धन्य भूवरी॥२॥**

**मित्र**–हो, ती आहे अशी खरी. पण ती तुला प्राप्त होणार कशी ! अरे, ज्याच्या पदरीं अखंड पुण्य असेल त्यालाच ती प्राप्त होणार. तूं उगीच बुवा मिटक्या कशाला मारितोस !

**सत्य०**–पुल्हां तीच तीच गोष्ट मला विचारूं नको.

मित्रा– **पद.** ( चाल–हरि मुरली वाजवी० )

**मति माझी गुंगवी ॥ रतिसम रमणी हृदय भुलवी ॥ मति० ॥मकरंदावरि मुखकमलाच्या ॥ किति मम मानसमधुप झुलवी ॥ मति०॥ साध्य मला ती होणें कैसी ॥ निजतेजें जी रविस लपवि ॥ मति० ॥ सुंदर मूर्ती रंगरसाची ॥ मजसि निराशें दुःखिं बुडवी ॥ मति० ॥**

**मित्र**–अलभ्य वस्तुची प्राप्ति इच्छिणारांची निरंतर अशीच अवस्था. राजारंकाचा योग जमतो कसा ?

स०–मित्रा, तूं कांहीं म्हण, पण तिची प्रीति म-जवर जडली आहे यांत संशय नाहीं.

मित्र–हें तूं कशावरून म्हणतोस ?

स०–अरे नाहीं का ती मजकडे पाहून हांसली ?

मित्र–हात वेड्या ! एवढ्यावरूनका तूं असें म्हणतोस ! अरे रस्त्यांतून जातांना ह्या सुंदर मुखड्या-कडे पाहून थोडक्याका बायका गद्गदां हांसतात ! म्हणून का त्या मजवर मोहित झाल्याशा समजा-वयाचें ! वाः तूं मोठा तर्कज्ञानी खरा !

स०–मित्रा, ती राहूं दे रे गोष्ट एकीकडे. पण तिजकडे माझें मन लागलें आहे त्यास मी काय करूं ? तिनें तर मला अगदीं मोहून टाकिलें आहे आणि तेणेंकरून तो प्रबल काम देखील मला मोहजालांत बद्ध करूं पहात आहे.

मि०–अरे कसचा काम घेऊन बसला आहेस. तूं सांग बरं कामाला आवरणारें कोण ?

स०–मन.

मि०—मग पहिल्यानें त्यालाच आवरना. मग तो बेटा काम काय करतो ?

स०—अरे तुला ठाऊक नाहीं. पहिल्यानें तो मनुष्याचें मन आपल्या स्वाधीन करून घेतो. नंतर त्यास सर्वस्वी जिंकितो. तुला ठाऊक नाहीं का ?

पद.

( चाल—मगरी बोले अवधारा० )

**मदनें जग मोहित केलें ॥ ऋषिवर मुनिवर इतर अमित नर स्ववलें जिंकियले ॥ इंद्रा शापें लाजविलें ॥ लाउनि चंद्रा डाग सदाचा क्षीण तया केलें ॥ विधिला अपूज्य ठरवीलें ॥ त्रैलोक्येश्वर हर कमलावर नाहिंच वघळीले ॥**

मित्र–( स्वगत ) हा तर झाला वेडा ! आणि फार वेळ मी याच्याशीं बोलत बसलों तर मीही वेडा होणार. आढेवेढे घेणें कांहीं उपयोगाचें नाहीं. येथून जावें हाच उत्तम मार्ग. ( उघड ) चल मित्रा आपण फुलें आणावयास जाऊं. ( जातात. )

## प्रवेश ४ था.

स्थल............लतामंडप.

**सावित्री**–(हातांत असलेल्या सत्यवानाच्या स्वतः रेखलेल्या चित्राकडे अवलोकन करीत )—

पद. ( राग परज. )

**मदना कां घालिसी घाला ॥ मजवरी कां घालिसी घाला ॥ शिव समजुनि मज व्यर्थ छळुनियां मारिसि काय मला ॥ ध्रु० ॥ नाहिं जटा ही वेणी शिरसीं ॥ मृगमदलेपन विष न गळ्यासी ॥ धवलकुसुम शिरिं नचि उज्ज्वल शशी ॥ भस्म गणासि कां पांडुरतेला ॥ १ ॥**

[ चंद्रकला प्रवेश करिते. ]

**चंद्र०**–सखे, हें काय आहे ग हातांत तुझ्या ? मला दाखिव पाहूं !

**सावित्री०**–( दुरून ) हा पहा माझा जिवलग.

**चंद्र०**–जरा तो माझ्याजवळ दे पाहूं.

**सावि०**–तो मी तुला कसा बरं देऊं ! राहूं दे माझा जिवलग माझ्याचपाशीं. तुला त्याशीं काय करायचें आहे ?

चंद्र०—पण जरा पाहूं दे तर खरी.

सा०—हा पहा. ( चित्र चंद्रकलेच्या हातीं देते. )

चंद्र०—( चित्र घेऊन व पाहून ) शेवटीं हाच का तुला आवडला ?

सावि०—तें तुला माझ्या आचरणावरून नाहीं का उमगलं ? सखे, अग—

### पद.

( चाल—धन्य धन्य धन्य आजि० )

सुंदर ही बघुनि मूर्ति मदनमोहिनी ॥
हृत्सागरिं हर्षलहरि येति निशिदिनीं ॥ धृ० ॥
चंद्रोदयिं विकसित जशी मिलित कुमुदिनीं ॥
घनवर्षे तृप्त जशि तप्त मेदिनी ॥
उत्सुक निधिसंगमार्थ हृत्पयस्विनी ॥
मन्मानससरविहारि हंस वरिं मनीं ॥ सुं० ॥

चंद्र०—सखे, तूं त्याला मनानें वरण्याच्या कामीं मोठें धाडस केलेंस. दूरवर विचार मुळींच केला नाहींस.

सावि०—असं कां बरं ह्मणत्येस सखे ?

चंद्र०–अग– पद.

( चाल–जानत प्रीतरीत० )

पाहुनि प्रीतिरीति तुझि बाई गे ॥ चित्तातें ॥ गुणवंते ॥ बहु वाटे ॥ प्राणसखे नवलाई गे ॥ धृ० ॥ कां वरिसी निर्द्रव्या नरा तुझि केवि भुले मनुबाई ॥ कितितरि जोड विशोभित ।. होई काय तव हि चतुराई गे ॥ १ ॥ कां त्यजुनी सिंधूस नदी कशि शुष्क ऱ्हदा तरि जाई ॥ उचितचि कांत रमे हरि ॥ ज्याचे विश्व सकल गुण गाई गे ॥ २ ॥

सावि०–अग, लग्न का धनाशीं लावायचें आहे कीं गुणाशीं ?

चंद्र०–गुणाला काय करायचें आहे. त्या भिकाऱ्याला वरून त्याच्या पाठीमागें झोळी घेऊन का तूं फिरणार ? तूं कांहीं ह्मण, पण तुझा हा विचार माझ्या बाई मनास मुळींच येत नाहीं हो.

सावि०–सखे, असं कां बरं ह्मणत्येस. अग, दुर्गुणी पतीच्या घरांत नित्य मिष्टान्नें खाण्यापेक्षां स-

ह्मणी पतीबरोबर भीक मागून खाणें हें अधिक चांगलें आहे. जो विद्वानाला मान असतो तो अविद्वानाला असतो का ? अग ऐक--

हरणीवृत्त.

**नरवर जरी पावे जन्मा विशाल कुलांतरीं ॥**
**सधन असुनी रूपें जैसा अनंग महीवरी ॥**
**परि न कधिं तो शोभा पावे अविद्य असे जरी॥**
**अवगणितसा राहे लोकीं पलासकुसुमापरी ॥**

चंद्र०--सखे, जर तूं त्या निर्धनाच्या मोहपाशांत बद्ध झाली नसतीस तर असें कधींच ह्मणतीसना. तुला ठाऊक नाहीं का शास्त्रकार कांहीं निराळंच ह्मणतात तें—

पद.

( चाल--जेव्हां उन्हाळा० )

**होय धनिकजरिअविद्य परि त्याजनसारेस्तविती**
**गाढा वक्ता मोठा ज्ञाता लोक तया ह्मणती ॥**
**देवासम त्या विद्वज्जनही भजती आळविती ॥**
**सोन्यामाजीं सद्गुण सारे ऐक सखे वसती ॥**

**सावि०**–अग अठ्यांशीं सहस्र ऋषींचीं अठ्यांशीं सहस्र मतें. हें असेल एखाद्या स्तुतिपाठक ऋषीचें वचन. पण जी बहुमान्य गोष्ट आहे ती ऐकिली नसशील तर ऐक–

**पद.** ( चाल–जी जी कर्मे० )

**होई पूजा श्रीशंभूची कैलासावरुती ॥**
**श्रीवैकुंठीं श्रीपतिपूजा विदित असे जगतीं ॥**
**पूजनीय त्या इतर देवता स्वस्थानीं असती ॥**
**परि गुणवंता बहु सन्मानें त्रैलोक्यीं पुजिती ॥**

**चंद्र०**–आतां मात्र माझा बाई संशय अगदीं फिटला. पण सखे विद्वान् असून धनवान् असता तर ?

**सावि०**–त्यांत अधिक तें काय झालें असतें ? सखे विद्वान् हाच खरा धनवान्. अग विद्या हें गुप्त धन असून सर्व धनांत श्रेष्ठ असें तेंच धन आहे. कारण त्याला कोणी चोर चोरूं शकत नाहीं. आणि आणखी चमत्कार तो असा कीं तें खर्च केल्यानें किंचितही कमी न होतां एकसारखें उलटें वाढतच जातें. ह्मणून माझा जो निश्चय झाला आहे तोच खरा. अग कदा-

चित् मेरु ढळेल, मृगजलानें तृषा शांत होईल सागर आपल्या मर्यादेचें उल्लंघन करील, परंतु माझा निश्चय कधींही ढळणार नाहीं. मला असें झालें आहे कीं, तो माझा हृदयविसावा मी माझ्या डोळ्यांनीं पुनः केव्हां पाहीन.

पद. ) चाल—बदल गये नैना० )

**मोहीलें मन माझें गे ॥ त्या गुणवंतें ॥ धृ० ॥**
**सेवाया जल विमल घनाचें चातकी जैसि अधीरा ॥ जाण सखे मी आतुर तैसी पीण्या प्रीतिरसातें ॥ १ ॥**

( जातात. )

# अंक ३ रा.

## प्रवेश पहिला.

स्थल..............राजमंदिर.

( अश्वपति, मालवी, व पुरोहित बसलेलीं असतां )

**अश्वपति**— पद. ( चाल—इस तन धनकी० )

**तिखट सुरी कन्याविरहाची ॥ जडली माझ्या हृदया साची ॥ धृ० ॥ तनया माझी शान्ति जिवाची ॥ तेवि सुशोभा मम सदनाची ॥ १ ॥ दुःसह मजला विरह तयेचा ॥ हंत कधीं तरि खंत मनाची ॥ २ ॥**

**पुरो०**—महाराज, आपण इतके शोकातुर कां होतां आपल्या सावित्रीबाई आल्या.

**अश्वपति**—सावित्री आली ! कोठें आहे ती ?

**मालवी**—कुठं आहे ती माझी लाडकी ?

**पुरो०**—यां पहा, मुख्य मंत्र्यासहवर्तमान येथेंच येंत आहेत.

( मंत्र्यासह सावित्री प्रवेश करिते. ती आईबापांस भेटल्यानंतर )

**अश्वपति**—( हर्षानें ) अहाहा ! मुलीच्या समयोचित आगमनरूपी वृष्टीनें माझा चिन्ताग्नि शमला. बैस, वत्से, जरा विश्रांति घे. ( सावित्री बसते ) सुखरूप आहेसना मुली ?

**सावि०**—सुखरूप आहें बाबा आपल्या आशीर्वादानें

**मालवी**—( सावित्रीच्या तोंडावरून हात फिरवीत असतांना ) सोन्यासारखी माझी मुलगी प्रवासाच्या कष्टांमुळें किती तरी काळी ठिक्कर पडून गेली आहे ही ! इच्या मुखाकडे पहावत देखील नाहीं.

**पुरोहित**—कोमेजलेल्या फुलासारखें मुलीचें मुखकमल म्लान होऊन गेलें आहे.

**अश्व०**—इतकेही कष्ट भोगून तुझ्या श्रमांचें सार्थक झालें का मुली ?

**सावित्री**–( आपल्यापाशीं ठेवलेलें सत्यवानाचें चित्र काढून ) हें पहा बाबा. ( चित्र बापाच्या हातांत देते. सर्व चित्राकडे पाहूं लागतात. )

**अश्व०**–( चित्र पहात असतां ) हा कोणी माझ्या परिचयांतला दिसतो.

**मुख्य मं०**–होय महाराज, हा द्युमत्सेनराजाचा गुणवान् पुत्र सत्यवान्.

**पुरोहित**–चित्र पण कसें हुबेहुब ! आतांच बोलेलसें वाटतें. वाहवा ! वाहवा ! मुली, शेवटीं ठीक वर शोधून काढिलास.

**अश्व०**–आतां ओळख बरोबर पटली. वेषांतरामुळें थोडासा संशय होता तोही दूर झाला. अहाहा ! तेजःपुंज तरी किती दिसत आहे हा !

**पुरोहित**—केवळ प्रतिसूर्य.

**सावित्री**—आणि यानांच मीं मनानें वरिलें आहे—आई—

होरी

झालें दासी सदाची ॥ जननी गे ॥ असें मी गुणराशी या भाग्यशिलाची ॥ धृ० ॥ चिन्ता माझी बहु दिवसांची ॥ कालि सुदैवें दूरचि साची ॥ पुरली आस मनींची ॥ किति ही करुणा जगदीशाची ॥ १ ॥

अश्वपति—योग्य, योग्य. वर उत्तम पाहिलास यासच मी तुझें विधियुक्त दान करीन. ( मुख्य मंत्र्यास ) अमात्य, नगरांत शर्करा वांटा, याचकांना धन देऊन तृप्त करा, बंदिवान मुक्त करा, मंगलवाद्यांचा गजर होऊं द्या.

( वाद्यें वाजूं लागतात. तदनंतर आंतून. )

नारद— पद. ( चाल—वारी संकट० )

भजरे भज मनुजा नित्य हरीला ॥
भवनिधि तरण्याला ॥

पुरोहित—नारदमुनी येत आहेतसें वाटतें.

मुख्य मंत्री—होय तेच.

**अश्वपति**–आज माझ्या आनंदाला पारावार नाहीं. चला आपण त्यांस सामोरे जाऊं.

( सर्व उठून उभे रहातात. )

**नारद**–( प्रवेश करितांना ).

**पद.** ( चाल–वारी संकट० )

**भजरे भज मनुजा नित्य हरीला ॥ भवनिधि तरण्याला ॥ क्षणभंगुर तनु दारा सुत धन ॥ अवघा मायेचा घोंटाळा ॥ ध्रु० ॥ गणुनी चिरकालिक विषयसुखाला ॥ विसरसि स्वहिताला ॥ न कळे कधिं घालिल काळचि घाला ॥ मग स्मरसि कुणाला ॥ सेवुनि मात्रा हरिनामाची शमवीं भवरोगाला ॥ १ ॥**

**अश्वपति**–यावें, बसावें येथें. ( नारद बसतो, राजा त्याची पूजा करितो. )

**नारद**–राजा, तुझें कल्याण असो. तुझा यशोवृक्ष निरंतर प्रफुल्लित असो. राजा, अरे, जिकडे पहावें तिकडे आनंदच आनंद ! अरे आज असें आहे तरी काय ?

दिंडी.

वदन आनंदित बघुनि तुझें राया ॥
हर्ष वाटे बहु माझिया मना या ॥
वृत्त कळवुनि सुखभाग मला द्याया ॥
नको इच्छूं संकोच मनिं धराया ॥

**अश्व०**—मुनिराज, वरशोधार्थ ही माझी कन्या राजतपोवनांत गेली होती, ती आतांच तेथून आली आहे. इणें द्युमत्सेनाचा पुत्र सत्यवान् मनानें वरिला तेणेंकरून माझ्या जिवाला परम आल्हाद झाला आहे. परंतु, मुनिराज, सत्यवानाचे गुणदोष आपल्या मुखानें श्रवण करण्यास मी इच्छितों.

**नारद**—ठीक आहे. राजा ऐक—

श्लोक.

सौंदर्यें जो रतीशा लपवि शशधरा शान्तिसद्बुद्धिवापी।
तेजें दूजा गभस्ती शचिपतिसम जो शूर वीर प्रतापी ॥
भावें पाळी सदा जो त्यजुनि जपतपा मातृभक्तिव्रतातें॥
सत्यें वागे ह्मणोनि द्विज ह्मणति तया सत्यवान स्वयेंतें॥

**मालवी**—एकूण माझ्या मुलीची परीक्षा खरी.

**नारद**–राजा, अरे, पण या सर्व गुणांचा नाश करणारा त्या राजपुत्राला एकच मोठा दोष आहे. त्याचें परिमार्जन करणें केवळ अशक्य आहे.

**सावि०**–( स्वगत ) असा कोणता बरं तो दोष असेल ? ( थांबून ) हं हं ! समजलं. ( उघड ) मुनिराज, दारिद्र्य हा आपण दोष समजत असाल, परंतु आपणाला माहितच असेल कीं, संपत्ति व विपत्ति या दोन्ही दशा मोठ्यालाच लागू असावयाच्या. क्षय व वृद्धि चंद्रालाच असतात, तारकांना तसं कांहीं असल्याचं आपण कधीं ऐकलं आहे काय ?

**पुरोहित**–मुनिवर्य, एकाद्या वराचें कुळ, विद्या, इत्यादि गुण पाहून त्याला जसा बाप आपली मुलगी देतो, त्याप्रमाणें ब्रह्मदेवही मुलाच्या गुणांची परीक्षा करून आपली एकुलती एक लाडकी कन्या जी दरिद्रता इच्या हातून त्याच्या गळ्यांत माळ घालवितो. व तिची दासी जी याचना तीही जावयास आंदणांत अर्पण करितो. ह्मणून दारिद्र हा दोष नव्हे.

**अश्वपति**–पण तो दोष दूर करण्यांत येईल. त्यांत काय आहे मोठेंसें, मुनिराज.

**सावि०**–आणि यदाकदाचित् तो दूर करण्यांत न आला तरी दारिद्र्यरूप अग्नीचा संताप संतोषरूप उदकानें शमवितां येईल.

**नारद**–अहाहा ! या भाषणानें माझ्या जिवाला केवढा आनंद होत आहे तरी ! खरोखर, नाना प्रकारचीं सोंगें घेऊन उपमा ही नटी गद्यपद्यरूप रंगभूमीवर येते व रसिक जनांचें मनोरंजन करून त्यांस मोठ्या आनंदानें नाचावयास लाविते. मुली तूं चतुर खरी. राजा, अरे, दारिद्य हा एक दोष आहे असें मी समजत नाहीं. परंतु सत्यवानाला दोष कांहीं निराळ्या प्रकारचा आहे.

**अश्वपति**–तो कसाही असो परंतु तो दोषरूपी वडवाग्नि त्याच्या विस्तीर्ण गुणसागरांत लपून जाईल.

**सावि०**–मुनिराज, गुलाबाला कांटे असावयाचेच चंदनवृक्ष सर्पांनीं निरंतर वेष्टिलेले असतातच.

**नारद**–राजा, तो लपून जाण्यासारिखा दोष नाहीं. दुधानें परिपूर्ण असलेल्या कुंभांत विषाचा एकच बिंदु टाकिला असतां जसें तें सर्व दूध विषवत् होतें त्याप्रमाणें या त्याच्या एकच दोषानें ते सर्व गुण दोषमय होतात.

**अश्वपति**–हें ऐकून तत्संबंधी माझी जिज्ञासा वृद्धिंगत होते.

**सावि०**–( चिंतायुक्त स्वगत ) आतां नारदमुनी काय बरं ह्मणतील कोण जाणे !

**नारद**–राजा, तो जाणण्याविषयीं नको तूं इच्छा धारण करूं. अरे, तूं सांप्रत लग्नकार्य उरकून घे. पुढें पहातां येईल.

**अश्वपति**–महाराज, माझ्या कन्येचें कल्याण आपल्या मनांत खरोखरींच वागत असल्यास तिच्या विवाहापूर्वी तिच्या पतीचे गुणदोष कळविणें हें आपलें कर्तव्यकर्म होय.

**मालवी**–मुनिराज, रोग्याचा प्राणांत झाल्यावर

मग कां वैद्याकडे औषधासाठीं जायाचँ ! विहीर खणावयाची ती का आग लागल्यावर ! एकदां शत्रू शहरांत शिरल्यावर मग का सैन्याची सिद्धता करावयाला लागायचँ ! अशी कोणत्या गांवच्या लोकांची रीति असेल कोण जाणे मुनिराज !

**नारद**–आतां कांहींच उपाय राहिला नाहीं. राजा, तुला कळविण्यास मला अतिशय दुःख वाटतें कीं, येत्या वर्षीं याच दिवशीं म्हणजे ज्येष्ठशुद्ध पौर्णिमेस रात्रीच्या प्रथम प्रहरीं सत्यवान् आपल्या देहाचा त्याग करील.

**सावि०**–( अतिशय दुःखानें ) अरेरे ! माझ्या आनंदमंदिरावर ही विजेसारखी मुनीची वाणी एकाएकीं कशी कोसळली ! देवा, तुझी इच्छा !

**अश्वपति**–वत्से, तूं इतकी दुःखी कां कां होतेस ? एखादा दुसरा योग्य वर पहा म्हणजे झालें.

**सावि०**–हे तात, आतां हें होईल तरी कसें ? जो वर म्यां एकवार मनेंकरून वरिला तो सोडून

दुसऱ्याला वरून मी माझ्या पातिव्रत्यधर्माला डाग कशी लावूं ।

**नारद**–(स्वगत) धन्य होस मुली ! तूं धन्य होस !

**अश्वपति**–मुली, तूं नको इतका आग्रह धरूं. अगे, तूं माझें ऐक. एखादा दुसरा वर पहा. पहा सांगतों ऐक.

**सावि०**–ही गोष्ट माझ्या हातून कल्पांतींही घडणार नाहीं.

**अश्व०**– **पद.** ( चाल–प्रिये सरली रात्र० )

**कशि पडलि भूल मुली तुजसी तुजसी ॥ करुनि दुराग्रह दृढ निज मनिचा ॥ स्वहितातें कशि मुकसि मुकसि ॥ धृ० ॥ होय सुखावह तरणी कैसा ॥ प्रलयाग्नी जरि वरुषि वरुषी ॥१॥**

**सावि०**–हे तात, आपण जाणतच असाल कीं, मी तुला देतों असें याचकाला भाषण केलें असतां तें जसें माघारें फिरत नाहीं तसेंच कन्यादान झालें असतां तें माघारें परावृत्त होत नाहीं.

अश्व०—पण सप्तपदीपूर्वीं लग्न फिरतें. काय पुरोहित, ही गोष्ट खरी आहेना ?

पुरोहित—खरी आहे. यास धर्मशास्त्राची संमति आहे महाराज.

सावि०—पण त्यापूर्वीं वधूनें मनानें वर वरिला नसेल तर. गुरुवर्य, आपण समजतां तसा हा प्रकार नाहीं.

नारद—गोष्ट सत्य आहे.

मा०—आतां या मुलीला मी काय सांगूं? मुली—

पद. ( चाल—अखंड हरि हरि० )

**धाडस करुनी मुली ॥ उगिच कां करिसि हानि आपुली ॥ धृ० ॥ अंगिकार या करुनि वराचा ॥ इहलौकिक संसारसुखाचा ॥ कां देसी गे बळी ॥ १ ॥ सोडिं दुराग्रह मनिंचा बाळे ॥ वरिं दुसरा वर ऐक सुशीले ॥ बुद्धि नव्हे ही बरी ॥ २ ॥**

सावि०—आई, अग गोड बोराला नेहमीं कीड असतेच. पण तूं माझ्या सुखासाठीं माझ्या व्रताआड

कां येतेस ? नको तूं माझ्यासाठीं इतकी कष्टी होऊं. आई तूं मला जन्म दिलेंस पण कर्म का दिलें आहेस? जें माझ्या प्राक्तनीं लिहिलें असेल तें घडेल. तूं निरर्थक दुःखी कां होतेस ?. आई, बाबा, आतां माझी सरशेवटची गोष्ट ऐका--

पद ( चाल--वाणी गोड किती० )

**वरिला तोचि मनीं ॥ नरमणि वरिला तोचि मनीं ॥ समवय गुरुजन सकल तयाविण ॥ एकोदर मानीं ॥ धृ० ॥ मेरु ढळे परि न घडे मिथ्या ॥ मम वाणी जोंवरि तरणी ॥ १ ॥**

**नारद**—हे सती, तुझा हा निश्चय पाहून मी सुप्रसन्न झालों आहें. राजा तुझ्या दुहितेचें दान तूं सत्यवानासच कर. तिच्या कल्याणाविषयीं जितकें मजकडून साधन होईल तितकें मी करीन. हे सती सावित्री, माझा आशीर्वाद ग्रहण कर—

पद. ( चाल--जब जस्तोंसे मेदी० )

**मनिंची तव आस पुरो मम वरप्रसादें ॥**
**पतिसह संसारिं सदा नांदें आनंदें॥धृ०॥**

निश्चय तव बघुनि हृदय मोदें मम कोंदे ॥
वाढो त्वत्सुभगद्रुम ईशकृपाजलदें ॥ १ ॥

( जातांना ) पद. ( चाल–होईमना० )

भज मना हरिपदांतें भक्तीं भावें रे ॥ धन सुत जाया अवघी माया ॥ मोहनिधीं कां बुडसी वायां ॥ धृ० ॥ विधि हर सुर मुनिवर स्तविती जयांसी ॥ घडी पलही तयां विसरूं नको ॥ क्षणभंगुर ही दुर्लभ काया ॥ हरिपदनौका जिवा तराया ॥ १ ॥

---

## प्रवेश २ रा.

स्थल......................गौतमाचें घर.

गाल०—( घाईघाईनें प्रवेश करून ) गौतमा–अरे–गौतमा !

गौतम—( आंतून ) ओ, कोणरे, हांक मारीत आहे तो ?

गाल०—अरे, मी गालव. चल, चल लौकर,

आंतून ओ! ओ! काय करीत बसला आहेस? राजाची स्वारी सिद्ध झाली आहे ना?

**गौतम**—अरे आलों. पण गोमुखी तर घेऊं देशील?

**गाल०**—वेडा कुठला! अरे, तेथें काय जप करायाला जायाचं आहे कीं बरोबर गोमुखी पाहिजे? अरे येतोस कीं नाहीं कीं मी आपला जाऊं एकटाच?

**गौतम**—( बाहेर येऊन ) अरे, जरा थांबरे. तिणें मोठ्या आवडीनें मजसाठीं करून ठेवलेलें थालीपीठ आणि थोडेंसें आंब्याचें ताजें लोणचें असाच घेऊन येतों.

**गाल०**—जा, जा, जा, जलदी घेऊन ये. राजकन्येच्या लग्नाचीं पक्वान्नें खातां खातां जिभेला वीट आला म्हणजे तोंडीं लावण्यास तीं उपयोगीं पडतील.

( त्याची स्त्री सुशीला प्रवेश करिते. )

**सुशीला**—हीं घ्या, नि जा लौकर! पण पुष्कळसी दक्षिणा मिळवून लौकर परत या बरं.

**गौतम**—अग भिऊं नको. साणेइतकं मोठें सोन्यांचं पदक पहा थोडक्याच दिवसांत तुझ्या गळ्यांत कसें लटकावून देतों तें. ( स्त्री हांसत जाते. )

**गालव**—( हांसत ) अरे चल चल, चल. लटकावून देणाऱ्या ! चल ( जातात. )

[ अश्वपति राजाची स्वारी मोठ्या
थाटानें वाजत गाजत जाते. ]

**अंक ३ रा समाप्त.**

---

# अंक ४ था.

## प्रवेश १ पहिला.

स्थल............अरण्य. द्युमत्सेनाचा आश्रम.

**द्युमत्सेन**–वत्सा सत्यवाना–

**सत्य०**–काय आज्ञा आहे तात ?

**द्युमत्सेन**–अरे, नित्याप्रमाणें मी आतां जप कर-

ण्यास बसत आहें. तूं द्वारीं ऐस. आज्ञेवांचून कोणास आंत येऊं देऊं नको.

सत्य०—ठीक आहे तात. आज्ञेप्रमाणें वर्तन करितों.

( आश्रमद्वारीं जाऊन उभा असतांना )

पद. ( राग—मालकंस )

जाउनि भाग्यशशी अस्ताशी ॥ आली दीन दशा उदयासी ॥ ध्रु० ॥ निर्धनता ती लाजवि अंतर ॥ नाशक मुखतेजासी ॥ विकल नरासि करी संतत जी ॥ दैन्याचि आणि तयासी ॥ उपजवि कलह सदैव तशी ती ॥ दूर करी स्वजनांसी ॥ १ ॥

( इतक्यांत अश्वपति मुख्य मंत्र्यासह प्रवेश करितो. )

अश्व०—अमात्य, हाच का द्युमत्सेन राजाचा आश्रम ?

मु० मं०—होय महाराज हाच. तोच पहा त्याचा पुत्र सत्यवान्.

**अश्वपति**–केवढा तेजःपुंज दिसत आहे तो ! चला आपण त्याच्या जवळ जाऊं. ( पुढें जातात. )

**सत्य०**–( स्वगत ) अरे आज इथें अश्वपति राजाचें आगमन कां बरें झालें असावें ! माझ्या दैवानें तर त्यांस येथें आणिलें नसेल ना ! ( पुढें जाऊन उघड ) महाराज, हा आपला नम्र बालक आपल्या चरणरजांचें वंदन करीत आहे.

**अश्वपति**–धन्य होस मुला. ( स्वगत ) अहाहाहा ! केवढी तरी लीनता याच्या अंगीं वसत आहे ही. ( उघड ) मुला, द्युमत्सेन महाराज आश्रमीं आहेत का ?

**सत्य०**–होय महाराज. जप करीत बसले आहेत. ( दोघांना बसण्याकरितां बाहेर ओटीवर आसनें मांडून ) महाराज, आपण ह्या आसनांवर बसून क्षणभर विश्रांति घ्यावी इतक्यांत मी आंत जाऊन हाच परत येतों. ( माजघरांत जातो. )

**अश्व०**–अमात्य पाहिलीत ना ही आदरसत्कार

करण्याची रीति ! अहाहा ही गोष्ट खरी आहे कीं, उंसाचे तुकडे तुकडे जरी केले, त्यास चरकांत घालून त्याचा रस काढला, अग्नीवर ठेवून त्याला कितीहि कढविलें, तरी जसा तो आपल्या गोडीचा त्याग करीत नाहीं त्याप्रमाणें सज्जनही विपत्तींत देखील आपले सद्गुण सोडीत नाहींत.

**मु०मं०**–खरें ह्मणतां महाराज. ज्याप्रमाणें उपजतच मृगीच्या डोळ्यांत शोभगारें काजळ असतें, तसेंच मोरांस चित्रविचित्र रंगांचे सुंदर पिसारे असतात त्याप्रमाणें, स्वभावतांच विनय हा गुण कुलीन पुरुषांच्या अंगीं निरंतर वास करीत असतो.

**सत्य०**–( माजघरांत असतां ) तात, अमात्यासह आपले मित्र अश्वपति आले आहेत.

**द्युमत्सेन**–( जप आटोपून ) कोठें आहे तो, कोठें आहे तो माझा परम स्नेही अश्वपति ? ( उठून पुढें चाचपत चाचपत चालूं लागतो. )

**अश्वपति**–( पुढें सरसावून ) हा मी आपल्या जवळच उभा आहें.

**द्युमत्सेन**–मित्रा, तूं पहिल्यानें मला कडकडून भेंट पाहूं कसा तो. ( दोघे एकमेकांस भेटतात. ) अहाहा ! बहुतां दिवसांनीं झालेला हा मित्रसमागम किती हर्षप्रद होत आहे. मी धन्य आहें. ( सत्यवान् आसनें मांडून ठेवितो. )

**अश्वपति**–मीही आपल्या दर्शनानें आज धन्य झालों.

**द्युमत्सेन**–अमात्य, आपल्याही भेटीनें मला अत्यानंद होत आहे.

**मु० म०**–महाराजांचें दर्शन मला धन्य करित आहे.

**द्युम०**–वत्सा सत्यवानाना, यांच्या करितां आसनें मांडलीं आहेस ना ?

**सत्य०**–होय, ती म्यां आधींच मांडून ठेविलीं आहेत.

**द्युम०**–बसा तर माझ्या मित्रांनो. ( ते बसल्यानंतर ) बसलां काय ?

**अश्वपति**–होय महाराज, मी आपल्या समोरच बसलों आहें.

**द्युम०**–मित्रा कुशल आहेसना ?

**अश्वपति**–कुशल महाराज..

**द्युम०**–हें ऐकून मला फार आनंद होत आहे. मित्रा, मृगया करितां करितां सूर्याच्या तापानें व श्रमानें व्याकुळ झाला असशील ह्मणून माझ्या आश्रमीं थोडी विश्रांति घेण्याकरितां आला असशील, नाहीं, बरें ? वत्सा, जा आणि आंतून ह्यांच्यासाठीं थंडगार साखरपाणी लौकर घेऊन ये.

( सत्यवान् जातो व पाणी आणून त्यांस देतो. )

**अश्व०**–( पाणी पिता पितां ) अहाहाहा ! हें पाणी अमृताहूनही किती अधिक गोड लागत आहे. ( पाणी प्याल्यानंतर ) महाराज, माझ्या मनःस्थितींत व चिंतेचा ताप दूर होऊन माझ्या जिवाला खरोखरींच विश्रांति मिळावी ह्या हेतूनें मी आपल्या आश्रमीं आलों आहें.

**द्युम०**–चिंता ! तुझ्यासारख्या पराक्रमी राजाला चिंता ! अमात्यासारखे तुझे सुज्ञ मंत्री असतां तुझा राज्यकारभार सुरळीत चालला असेलच.

**अश्व०**–होय सुरळीत चालला आहे.

**द्युम०**–घरचीं सर्व मनुष्यें सुखी आहेतना ?

**अश्व**–सर्व सुखी आहेत.

**द्युम०**–तर मग चिंता कशाची ? बरं, थोड्या दिवसांपूर्वीं तुझी कन्या या तपोवनांत वरशोधार्थ आली होती असें म्यां तुझ्या या प्रधानाच्या मुखानें ऐकलें. तर तिच्या इच्छेप्रमाणें तिचें कार्य झालें का ?

**सत्यवान्**–( स्वगत ) बाबांनीं माझ्या मनांतलीच गोष्ट काढली.

**मु० मं०**–अद्यापि कार्य झालें नाहीं ह्मणून महाराजांचें मन चिंतेनें व्यग्र झालें आहे.

**सत्य०**–( स्वगत ) माझीही तशीच अवस्था झाली आहे.

**द्युम०**–तर मग मित्रा, चिंतेच्या-निवारणार्थ कोणत्या उपायाची योजना करणार ?

**मु० मं०**—महाराज, याचा उपाय आपणांपाशींच आहे.

**द्युम०**—(आश्चर्यानें) काय याचा उपाय मजपाशीं आहे ! मोठेंच आश्चर्य !

**अश्व०**—महाराज, ह्यांत आपणांला आश्चर्य वाटण्यासारखें कांहींच नाहीं. माझ्या कन्येनें आपल्या या गुणवान् पुत्र सत्यवानाला मनानें वरिलें आहे.

**स०**—(स्वगत) अरे, हें मीं काय ऐकतों. चातकपक्ष्याच्या मुखांत एकाएकीं स्वातीनक्षत्राची पर्जन्यवृष्टि !

**द्युम०**—मित्रा, समानशीलांशीं सख्य तसाच संबंध सुखकर होतो. तर मग हा योग जमतो कसा.

**अश्व०**—तें कांहीं असो. परंतु महाराज, एवढी ही माझी विनंति आपणास मान्य केलीच पाहिजे !

**मु० मं०**—संकटसमयीं मैत्रीची खरी परीक्षा होत असते.

**द्युम०**— मित्रा, तुझ्या भिडेस्तव तुझी ही गोष्ट

मान्य करणें मला भाग आहे. परंतु घरांतल्या संमती-वांचून माझ्यानें आतांच तुला रुकार देववत नाहीं. वत्सा, जरा मला आंत घेऊन चल.

**शैब्या**–( बाहेर येऊन ) नको इतके श्रम घ्यायला, ही पहा मीच बाहेर आलें.

**अश्वपति**–मातुश्री, मी आपणांस नमस्कार करितों.

**शैब्या**–तुमचे सर्व मनोरथ परिपूर्ण होवोत.

**अश्वपति**–मातुश्री, “ माझे सर्व मनोरथ परिपूर्ण होवोत ” हा आपला आशीर्वाद माझी कन्या सावित्री आपल्या पदरीं घेऊन सत्य करा ह्मणजे झालें.

**शैब्या**–इकडे मान्य झालेली गोष्ट मलाही मान्यच. पण—

**अश्वपति**–मी समजलों. त्या गोष्टीचा उच्चार करण्याचें अगत्य नाहीं. आपल्या स्थितीविषयीं सर्व कांहीं मला माहित आहे. ह्या कामीं कोणत्याही रीतीनें आपणांस हीनत्व न येईल असें मी करीन.

द्युम०—तर मग “ शुभस्य शीघ्रं ” जा आणि मुलीचें लग्नकार्य त्वरित उरकून घे.

अश्वपति—मजकडून सर्व सिद्धता आहे. हा मी त्याच कामास लागतों. ( जातात. )

---

## प्रवेश २ रा.

स्थल..............अरण्याचा भाग.

सत्य०—( मित्रास येतांना पाहून ) मित्रा, अरे इकडे ये इकडे ये. अरे एवढा वेळ होतास तरी कुठें ! भेट भेट मला पाहूं कसा तो ! ( एकमेकांस भेटतात. )

मित्र—( भेटत असतांना ) अरे पण हळूहळू तरी भेट, हाडांचा काय चुराडा करून टाकतोस !

सत्य०—मित्रा, तुला काय सांगूं रे ! आज मी खरोखरींच कृतार्थ झालों.

मित्र—अरे, आज तुला असें मिळालें तरी काय कीं तूं इतका हर्षानें वेडा झाला आहेस.

स०–मित्रा, तूं माझी गोष्ट ऐकशील तर तुझीही अवस्था माझ्यासारखीच होणार आहे. कारण—

पद. ( चाल–आजि मोरा० )

**केलि मम दैवें सफल मनःकामना ॥ धृ० ॥ वरि मज स्वमनीं नृपतनया ती ॥ वाटे मोद महा मना ॥ १ ॥**

मित्र–काय, त्या सावित्रीनें तुला मनानें वरिलें ! अरे, हें स्वप्न कीं खरी गोष्ट !

स०–खोटें बोलतांना तूं मला कधीं तरी ऐकिलें आहेस का मित्रा ?

मित्र–कधीं नाहीं बरं पण, आतां तिच्या बरोबर तुझें लग्न केव्हां होणार ?

स०–अरे, जी घटका जात आहे ती लग्न होण्याचीच. वधूकडे देवकप्रतिष्ठा तर केव्हांच होऊन चुकली.

मित्र–काय ह्मणतोस ! तर मग बुवा, तूं आज गगनाला खरोखरींच हात घातलास. आणि माझीही पोळी पिकविलीस ! दे पाहूं टाळी कशी ती.

**स०**–ही घे टाळी. ( एकमेकांस टाळ्या देतात. ).

**मित्र**–ह्मटलं आहे तें खरें आहे कीं, " स्त्रियश्चरित्रं पुरुषस्य भाग्यं देवो न जानाति कुतो मनुष्यः "

**स०**–खरी गोष्ट, स्त्रियांचें चरित्र व पुरुषांचें भाग्य हीं देवादिकांनाही कळत नाहींत तर मग मनुष्याची काय कथा !

**मित्र**–अरे, पुरुषांचें भाग्य ह्मटलें ह्मणजे, पातेऱ्याखालीं. केव्हां पातेरा उडून जाऊन त्याचा प्रकाश आंतून पडेल हें कोणासही कळत नाहीं.

**स०**–" दैवस्य गहना गतिः " एकदां कां दैव अनुकूल झालें म्हणजे मातीचें सोनें करण्यास त्याला क्षणाचाही अवकाश नको.

**साकी.**

होतां अभिमुख दैव नराला काय उणें मग त्यातें॥
नेउनि विलया सकल आपदा देई इच्छित त्यातें॥
गहनचि दैवगती ॥ करि जी रंकाही नृपती ॥१॥

[ जातात. ]

## पद.

आंतून—

### श्लोक.

माथां पिंगट त्या जटा विलसती गंगा असे निर्मल ॥
वामांकीं गिरिजा वसे निशिदिनीं भाळीं शशी उज्ज्वल
योगीवृंद मुनी सुरासुर तसे ध्याती जयाच्या पदां ॥
तो गौरीहर या वधूसह वरा रक्षो सदासर्वदा ॥

---

## प्रवेश तिसरा.

स्थल..........लग्नमंडपाच्या बाहेरचा भाग.

ऋषिकुमार—काय हो गुरुजी त्या लग्नमंडपाची शोभा ! अहो ती जितकी वर्णावी तितकी थोडीच ! माझे तर डोळे थक्क झाले बुवा, ती पाहून. अहाहा ! ती शोभा काय वर्णू !

### कटाव.

त्या लग्नमंडपाची ॥ शोभा न वर्णवे साची ॥ धृ० ॥ रत्नमंडित मंडपद्वारीं ॥ सफल कर्दली शोभति भारी ॥ तेंवि तोरणें मंगलकारी ॥ लग्नमंडपीं मऊ गालिचे ॥ किनखापाचे लोड मजेचे॥

अत्तरदान्या निवळ रुपेरी ॥ तेंवि कनकमयें मीनाकारी ॥ हार तुरेहि सुवासिक भारी ॥ ताटें भरुनि मधीं ठेविले ॥ अगणित सोज्वल-दीपज्योती ॥ चहूंकडे लख लख लख करिती ॥ थै थै छुम् छुम् नटी नाचती ॥ धुम् धुम् धिरिकिट मृदंग वाजे ॥ कुं कुं कुंकुं मधु आवाजे ॥ सारंग्या बहु बोल बोलती ॥ रागरागिणी नटी आळविती ॥ अशा मंडपीं इष्ट मित्रसह ॥ अतितर सुंदर मदनमनोहर ॥ शृंगारुनि बसविती बधूवर ॥ बघुनि तयांतें मुदिता अतितर ॥ होय वृत्ति चित्ताची ॥ त्या लग्न० ॥

**राजपुरोहित**–झालें एकदांचें लग्न निर्विघ्न पार पडलें. मधुपर्क, कन्यादान, विवाहहोम, ऐरिणीप्रदान इत्यादि विधी यथासांग होऊन शेवटीं आशीर्वादही झाला. गृहप्रवेशास आजचा चांगला मुहूर्त असल्या-मुळें तोही आजच उरकला. आतां जिवाला थोडीशी विश्रांति मिळाली.

**शिष्य**–ठीकच म्हणतां गुरुजी, कारण त्या सर्व

विधींत आपली होती मात्र तोंडाची बडबड, परंतु येंथला नारळ तेथें, तेथला कलश येथें, मांडतां सवरतां माझ्या तर बुवा, कमरेच्या हाडांचा खुळखुळा होऊन गेला आहे. एव्हां तीं केव्हां जागच्या जागीं येऊन बसतील कोण जाणे !

रा०पु०—वेडा कुठला ! अरे यथास्थित भोजन झालें ह्मणजे सर्व थकवा उतरेल. आणि सर्व कांहीं ठीक होईल. ( थांबून ) अहाहा ! लोक म्हणतात ती गोष्ट खरी आहे कीं, लग्न सारिखा आनंददायक दुसरा कोणताहि उत्साह नाहीं, हा दिवस तरी मला किती प्रसन्न दिसत आहे !

पद ( राग—बेहाग. )

**सौख्याचा रवि पूर्ण उगवला ॥ खुलवि किती शुभकार्यदिनाला ॥ध्रु० ॥ शुभकाळीं त्या ग्रहीं सुखें वर ॥ कुसुमासम मृदु वधूकराला ॥ सावित्री ती सत्यवताला ॥ शोभे जैसी रति मदनाला ॥ १ ॥**

## प्रवेश ४ था.

स्थल.....................द्युमत्सेनाचा आश्रम.

ऋषिकन्या व चंद्रकला—

अंजनीगीत:

धन्य धन्य हा दिन सोन्याचा ॥
लग्नोत्सवमंगलकार्यांचा ॥
कन्यावरसंसारसुखाचा ॥
साधक जो जगतीं ॥ १ ॥
भाग्यमित्र तव उदया आला ॥
इच्छित तुजला कांत मिळाला ॥
उपभोगीं संसारसुखाला ॥
आनंदें सखये ॥ २ ॥

सावित्री—सख्यांनों, आज खरोखरींच आनंदाचा दिवस; पण बाबा आजच घरीं जाणार ह्मणून जिवाला फारच चुटपुट लागली आहे. ( रडते )

चंद्रकला—सखे, अशी रडूं नको. पहा, ते तुझे बाबा तुझा निरोप घेण्याकरितां तिकडून येत आहेतसें वाटतें.

**सावि०**–होय बाबाच येत आहेत. सखे, त्यांचे पाण्यानें भरलेले डोळे पाहून मला रडें आवरत नाहीं. ( रडत उभी रहाते. )

( राजपुरोहित व मुख्य मंत्री व मालवी यांसह शोकातुर झालेला राजा अश्वपति प्रवेश करितो. )

**अश्वपति**– पद ( चाल–गेली प्रिया मम० )

**पाळियली प्रिय सावित्री ही शिशुसम आजवरी॥**
**देवोनी ती सत्यवताला केली दूर परी ॥**
**कन्याधन ही ठेव पराची सकलां विदित जरी ॥**
**देतां परि ती ज्याची त्याला येती उभड उरीं ॥**
**गहिंवरवी किति योगी त्यागी कन्याविरह तरी॥**
**काय करी मजसम संसारी केवीं शान्ति धरी ॥**

**रा० पु०**–राजा, अरे हा समय शोक करण्याचा नव्हे. परंतु मुलीला भेटून आनंदानें स्वदेशीं गमन करण्याचा होय.

**अश्वपति०**–बाळे, जरा इकडे ये.

**सावि०**–( रडत रडत ) ही आलें बाबा. काय म्हणतां ?

**अश्वपति०**—मुली, नको अशी रडूं. उगी रहा.

**सावि०**—( रडत ) बाबा, आपण आजच मला इथें ठेवून जाणार ना! अरेरे! आतां हा तुमचा वियोग मला कसा सोसेल!

**अश्वपति**--वत्से तूं भिऊं नको. तूं आपल्या पतीच्या सेवेंत एकदां निमग्न झालीस ह्मणजे तुला आमचा विसर लौकरच पडेल. ( द्युमत्सेनास ) महाराज, ही माझी मुलगी मी आपल्या पदरीं अगोदरच घातली आहे, परंतु आणखीं विनवितों कीं—

पद. ( राग—बहार. )

**घालीं अपुल्या पदरीं बाला ॥ एकुलती प्रिय दुहिता विनता ॥ पुत्रप्रेमें पाळा तिजला ॥ ॥ ध्रु० ॥ उभय कुलांतें उद्धरि ऐसा ॥ योग्य तोचि पथ विनवीं आपणां ॥ दावुनि करणें अबला प्रबला ॥ १ ॥**

**द्युमत्सेन**—राजा, तूं इतका दुःखी कशाला होतोस! मी तुझ्या मुलीचा प्रतिपाळ तुझ्या इच्छेप्रमाणेंच करीन.

**मालवी**–( शैब्येस ) बाई, माझी पदर पसरून आपणाला विनवणी इतकीच आहे कीं, माझ्या मुलीला माझी आठवण न पडेल असें करा म्हणजे झालें.

**शैब्या**–बाई, मी कितीही केलें तरी आईची कां सर मला येणार आहे ? आई ती आई सासू ती सासू पण ही मुलगी माझीच आहे असें समजून माझ्यानें इला जितकें सुख देववेल तितकें देईन. तुह्मी कांहीं काळजी करूं नका.

**रा० पु०**–आपणांस जशी ही एकुलती एक मुलगी आहे त्याप्रमाणेंच यांसही ही एकुलती एकच सून आहे, ह्मणून आपली मुलगी लाडांत राहील. वत्से सावित्री,–

**सा०**–( पुढें जाऊन ) काय आज्ञा.

**रा० पु०**–मुली, तुझ्या जन्माचा प्रकार ध्यानांत आणतां ह्यापुढें त्वां कोणत्या रीतीनें वागावें हें तुला सांगावयाला नकोच. परंतु लोकव्यवहाराकडे लक्ष देतां तुला चार गोष्टी सांगाव्याशा वाटतात त्या चित्त देऊन ऐक.

सावित्री—त्या मी मोठ्या आनंदानें ऐकेन. आणि त्याप्रमाणें वागेन.

रा० पु०— पद. ( चाल–गुरुकृपाअंजन. )

वडिलांसंगें विनयें वागें ॥ ठावीं आदर नित्य नवा गे ॥ पतिचरणांतें सेवित जागे ॥ निजगृह-कृत्यीं संतत जागें ॥ अवमानी जरी पति तुज रागें ॥ शमविं तयासी त्व अनुरागें ॥ ऊर्जित-काळीं नम्र रहा गे ॥ दासजनांवरि ठेविं दया गे होसी मान्य जगीं या योगें ॥ जाण हसें या सुगुणवियोगें ॥

अश्व०—हा आपला उपदेश स्त्रियांना किती कल्याणप्रद आहे ! अहाहा ! हा आपला उपदेश मनांत ठेवून वर्तणाऱ्या स्त्रिया जगतांत खरोखरींच धन्य होतील.

सा०— पद. ( चाल–देखियलें नवल० )

किति सुखद असे वाणी ही स्त्रीजनां तरी ॥ ध्रु० ॥ येतां रवि उदयगिरीं ॥ जाय जेविं तिमिर दुरि ॥ बोधतेज किति झडकरि ॥ हृत्तमा

**हरी ॥ १ ॥ उपदेशित ब्रह्मवचन ॥ पाळिन मी व्रत समजुन ॥ करितां हें वचन कथन ॥ मुदित अंतरीं ॥ २ ॥**

**चंद्रकला**–सखे, माझीही मनोदेवता तुला कांहीं सांगावयाला मला सुचविते. पण त्याचा तुला त्रास तर होणार नाहींना ?

**सावि०**–सखे, आज तुझ्या गोड संगतीचा लाभ मला एकाएकीं नाहींसा होणार म्हणून तूं आज जितकी मजबरोबर अधिक बोलत राहशील तितका मला अधिक आनंद होणार आहे.

**चंद्रकला**–ऐक तर मग. सखे–

पद ( चाल–वरमाई० )

**नत राहीं कांतचरणीं ॥ ध्रु० ॥ सम प्रीती स्वपतिवरुती ॥ सुखदुःखीं ठेविं चित्तीं ॥ व्रत पतिचें पाळी भक्तीं ॥ साध्वी ती धन्य अवनीं ॥ १ ॥ म्हणताती साधुसंत ॥ बुध योगी ऋषि महंत ॥ वनितांसी नाव कांत ॥ तारक ती जाण रमणी ॥ २ ॥**

**मु० मंत्री**—महाराज, प्रयाणमुहूर्त टळेल. त्वरा करावी.

**द्युम०**—वत्से सावित्री, विलंब होत आहे म्हणून एकदां आईबापांना भेटून सांग कीं जा आतां.

**चंद्रकला**—( रडत ) नाहीं. पहिल्यानें मला भेट आणि निरोप दे. हा ! सखे, काय सांगूं—

**पद.** ( राग—जोशी असावरी )

**सोसेल हा विरह कसा मजला ॥ ध्रु० ॥ स्मरण तुझ्या गे मधुसंगाचें ॥ नित जाचिल जाण जिवाला ॥ १ ॥ हौस न पुरली आस न उरली ॥ सुखलाभचि आज निमाला ॥ २ ॥**

**सावि०**—( रडत ) आणि माझ्याही जिवाला सखे तुजवांचून सुख कोठून होणार आहे ?

**पद.** ( चाल—नको टाकूं मला० )

**तव विरह सखे छळिल करिल विकल मला गे ॥ ध्रु० ॥ विमल तुझी प्रीति सतत ॥ अंतर मम करित मुदित ॥ जशि कुमुदा करि विकसित ॥ चंद्रकला गे ॥ १ ॥ लाभे जरि मजशीं पति**

**अंतरली तव संगति ॥ विरह दुःख दुःसह किति ॥ सांगुं तुला गे ॥ २ ॥**

**रा० पु०**–वत्से, तुझ्या होणाऱ्या वियोगानें विकल झालेल्या पित्यास एकदां भेटून, जाण्यास निरोप दे. उगीच उशीर कां करितेस ?

**सावि०**–( रडत ) आई ! ताता ! ( भेटते )

**अश्वपति**– वत्से,— **पद**. ( चाल–भैरवी. )

**जिव हा राहि कसा, बाळे ॥ होइल निशिदिनीं तुजविण व्याकुळ ॥ मीन जळाविण जैसा ॥ बाळे, ॥ ध्रु० ॥ होउनि तापद विरह तुझा मज ॥ जाळिल पोळिल तैसा ॥ शांति कशी तरि जीव धरी हा होय जरी मी ऐसा ॥ १ ॥**

**मालवी**–(रडत) बाळे, येथूनच मला मंदिर शून्य दिसूं लागलें आहे. तेथें गेल्यावर मी तुझ्या जागीं कोणास गे पाहूं !

**सावि०**–( रडत ) आई, आतां ही माझी प्रिय सखी माझ्याच जागीं आहे असें तूं समज. आणखी तुला मी काय सांगूं ?

**चंद्र०**–(रडत) आणि मी कुणाला समजूं तुझ्या जागीं सखे ?

**सावि०**–आई, आणखी कांहीं दिवस बाबा इथें राहिले तर नाहींका चालणार ?

**अश्वपति०**–कसें चालेल बाळे ! स्वकार्याकरितां स्वदेश सोडून परदेशांत फार दिवस राजानें राहूं नये अशी राजनीति आहे. ( कन्या फार रडत असलेली पाहून ) अरे, आतां काय करावें ?

**रा० पु०**–राजा, अरे तूं मोठा ज्ञानी व विवेकी असतां कन्यावात्सल्यानें इतका मोहवश होऊन या वेळीं मुलीचें समाधान करणें एकीकडेस ठेऊन स्वतांच रडत बसला आहेस ह्याला म्हणावें तरी काय ?

**मुख्य मं०**–महाराज, चलावें आतां. प्रयाणमुहूर्तास पाव घटका मात्र उरली आहे. चलावें.

**अश्व०**–( शोक आवरून ) मुली, यथाकाळीं तुझें दान योग्य वरास देऊन मी लोकनिंदेपासून मुक्त झालों. परंतु तूं मला आजन्म अंतरणार म्हणून जि-

वाळा फारच वाईट वाटतें. असो आतां तूं मला सरशेवटची भेटून निरोप दे.

**सावि०**–( आईबापांना भेटून रडत ) हीचना आतां तुमची माझी शेंवटची भेट ! आई, ताता—

**पद.**

( मालकंस. चाल–शिव शिव शंभोगा० )

**लोभ असों द्यावा मजवरी ॥ सदैव आठव ठेवा माझा ॥ धृ०॥ चंदनलतिका पात जसा तळीं ॥ मलयनगावरुनि व्हावा ॥ अंतरलें मी अंकातें या ॥ केविं विरह हा सोसावा ॥ १ ॥**

( शैब्या पुढें सरसावून सावित्रीचा हात धरून तिला पाठीमागें आणिते. राजा आणि मालवी शोकयुक्त होत्सातीं राजपुरोहित, चंद्रकला व मुख्य मंत्र्यासहवर्तमान जातात. )

---

## प्रवेश ५ वा.

स्थल......द्युमत्सेनाच्या आश्रमाचा पुढचा भाग.

( सावित्री व तिची सखी चंद्रमुखी प्रवेश करितात. )

सावि०—उदास होत्साती. ) सखे, घरांतली स्थिति पाहून खरोखरींच ग मला वाईट वाटतें ! घे हे नग आणि ठेव तुझ्यापाशीं. ( एकेक दागिना काढून सखीस देत असतांना )

### पद.

( जोगी असावरी. चाल—राहि कसा. )

**कसा मज शोभेल हा शृंगार ॥ धृ० ॥ नग सोन्याचे नवरत्नांचे ॥ जाण सखे मज भार॥१॥**

चंद्र०—असें काय करितसे सखे हें ! अग, अजून तुझ्या लग्नाला पुरते पांच दिवस देखील झाले नाहींत तोंच सर्व दागिने आंगावरून काढूं पहातेस तुला ह्मणावें तरी काय ? नव्या नवरीनें कांहीं दिवस दागिने काढूं नयेत.

सावि०—काढूं नयेत खरें. ( थांबून ) पण नाहीं, हे असूं दे तुझ्यापाशीं. कारण,—

( सदरील पदाचें दुसरें कडवें. )

**नग ऋष्याश्रमिं वैराग्यादिक ॥ भक्तिज्ञान विचार ॥ २ ॥**

**चंद्र०**–सखे, तूं ह्मणतेंस ती सर्व गोष्ट खरी, पण आणखी चार दिवस तुझ्या आंगावर दागिने असले ह्मणून काय झालें ? अग, नवी नवरी दागिन्यांवांचून का शोभते ?

**सावि०**–खरी गोष्ट, पण आतां या अलंकाराचें मला कांहीं अगत्य नाहीं. हे तुझ्यापाशींच ठेव किंवा त्यांचें तुला जें वाटेल तें कर. कारण स्त्रियांची खरी शोभा ह्मटली ह्मणजे—

वरील पदाचें तिसरें कडवें. )

**पतिसेवा ती सकल स्त्रियांसी ॥ नवरत्नालंकार ॥ ३ ॥**

( जातात. )

**अंक ४ था समाप्त.**

---

# अंक ५ वा.

## प्रवेश पहिला.

स्थल.........द्युमत्सेनाच्या आश्रमाचा भाग.

(सावित्री व तिची सखी चंद्रमुखी प्रवेश करितात.)

सावि०–( रडत )

गज्जल.

( कालिंगडा, चाल–जाळि हृदया विरह शिशुचा० )

**पाप अवघें येई उदया पुण्य सारें लोपलें ॥**
**केविं कंठूं काल कोठें कर्म कैसें कोपलें ॥ ध्रु० ॥**
**कोण टाळी लेख विधिचा रुधिर चित्तें आटलें ॥**
**कांतरहिता शून्य कांता भाग्य अस्ता पावलें ॥ १ ॥**

**चंद्र०**–सखे, पूर्वी कधींही तुझ्या मुखांतून असे अमंगल शब्द निघालेले मी ऐकिले नव्हते. आणि आज तूं असें हें काय ह्मणतेस !

**सावि०**–सखे, ती गोष्ट तुला सांगाण्यासारखी नाहीं. सांगितली असतां तुला फार वाईट वाटेल. ह्मणून तूं ऐकण्याविषयीं आग्रह न करशील तर बरें.

**चंद्र०**–अग पण सखे, मला सांग तर खरी. तुझें दुःख हलकें करण्याचें माझ्या हातीं असलें तर—

**सावि०**–सखे, माझें दुःख कमी करण्याचें कोणाच्याच गे हातीं नाहीं. अग तुला काय सांगूं—

गरबा ( चाल–जोंयु जोंयु० )

**आजि सखये मजला शून्य अवघें जग भासतें॥ धड धडतो माझा ऊर काळिज अति कांपतें ॥ धृ० ॥ कथियेला जो नारदमुनिनें आलासे दिन आज गे ॥ कांहीं कळेना कांहिं सुचेना काय घडावि प्रभुराज ॥ हृदयीं भय वाटतें ॥ आजि० ॥**

( इतक्यांत सत्यवान् वनांत जाण्याकरितां हातांत कुऱ्हाड घेऊन प्रवेश करितो. त्याला पाहून सखी निघून जाते.

**सत्य०**–प्रिये आज पूर्ण तीन दिवस झाले. बाबांनीं तुला कितीही सांगितलें तरी तूं कांहीं खात नाहींस, पीत नाहींस आणि कोणास दिसूं नये म्हणून एकांत स्थलीं अशी रडत उभी रहातेस असें तुझ्या मनांत

दुःख तरी कोणतें आहे ? आणि असे उपवास तरी करण्यास तुला कोणी सांगितलें आहे ? तुला कांहीं झालें नाहींना ? सांग सांग, प्रिये, कांहीं झालें असल्यास औषधी उपचार करवितों.

**सावि०**–( रडत रडत ) मला कांहीं होत नाहीं आणि उपोषणेंही करायला मला कोणी सांगितलें आहे असें नाहीं, पण मला कांहींच खावेंसें कीं प्यावेंसे वाटत नाहीं त्याला मी काय करूं ? असो. पण प्राणनाथ माझी आपणाला आज हात जोडून इतकीच विनंती आहे कीं—

पद.

( चाल–मोरे झ्यांझ बदरिया बाजोरे० )

**नका जाऊं आजि वना प्राणेशा ॥ ध्रु० ॥ भय मज वाटे आज गुणीवरा ॥ राहुनि आश्रमिं संगातें ॥ अभय करा मज नाथा ॥ नका० ॥**

**सत्य०**–वेडी कुठली ! तुला आणि भय ! अग, जोंपर्यंत हा अक्षय भाता माझ्या स्कंधावर झळकत

आहे, आणि हें माझ्या हातांत असलेलें विजयी धनुष्य टणत्कार करीत आहे, तोंपर्यंत तुला कृतांत काळाचेंही भय नाहीं.

**सावि०**—प्राणनाथ, तें मला ठाऊक आहे. म्हणूनच आपण वनांत न जाल तर बरं होईल.

**सत्य०**—प्रिये, बाबा आश्रमीं नसते तर तुझी ही गोष्ट मी खरोखरींच मान्य केली असती. पण आज आश्रमीं मुळींच सर्पण नसल्यामुळें मला तें आणण्याकरितां वनांत गेलेंच पाहिजे. तुझ्या मनास जर भय वाटत असेल तर, आई, बाबा आश्रमीं आहेतच. त्यांच्यापाशीं बसून रहा. इतक्यांत मी हाच परत येतों.

**सावि०**—प्राणनाथ, आपला असाच जर निश्चय आहे तर मी येतें आपल्यासवें वनांत. मला घेऊन जा.

**सत्य०**—वाहवा ! मग तर काय दुष्काळांत तेरावा महिना ! अग, एकसारख्या तीन दिवसांच्या उपोषणानें तूं किती व्याकुळ झाली आहेस ! डोळे किती

खोल गेलेले दिसताहेत ! पाय थरथर कांपत आहेत. तुझ्या अंगीं उभें रहाण्याची देखील शक्ति नाहीं आणि म्हणतेस " मी आपल्याबरोबर येणार. " तर तूंच सांग प्रिये, कीं तुझ्यानें त्या बिकट अरण्यांत चालत कसें बरें येववेल ?

**सावि०**—प्राणनाथ, या उभ्या वर्षांत आपणापाशीं प्रेमावांचून दुसरें कांहीं तरी म्यां कधीं मागितल्याचें आपणाला आठवतें का ?

**सत्य०**—नाहीं पण प्रिये, तुझा इतका आग्रह तरी कां बरें असावा ?

पद.

( बेहाग. चाल—मेंधी लगावन दे० )

**येसी कां वनिं आज ॥ प्रिये गे ॥ ध्रु० ॥ अवमानाया विनति तुझी ही ॥ वाटतसे मज लाज ॥ १ ॥**

**सावि०**—(रडत) प्राणनाथ, नका हो माझी विनंती अमान्य करूं, मी आपणापाशीं पुन्हां कधींही कांहीं मागणार नाहीं. परंतु या वेळीं—

पद. ( चाल-विनवी जोडुनी करां० )

**सोडा मनिंची अडी ॥ नाथा सोडा मनिंची अडी ॥ मान्य करा जरि विनती माझी ॥ होय वेडिवांकुडी ॥ जाइल युगसम घडी ॥ नाथा जाइल युगसम घडी ॥ कोण जवळ तरि घोर वनांतरिं ॥ पडतां जरि सांकडीं ॥**

**सत्य०**-प्रिये, तुझी विनवणी ऐकून तुला मजबरोबर न्यावेंसें वाटतें. परंतु तुला ठाऊक नाहीं का कीं मी आई व बाबा यांच्या आज्ञेवांचून एकही पाऊल टाकीत नाहीं ह्मणून ?

**सावि०**-हं. समजलें प्राणनाथ. ( लाडीगोडीनें ) पण सासूबाई व मामंजींनीं आज्ञा दिल्यावर मग मला संगातं घेऊन जालना ? खचित घेऊन जालना ?

**सत्य०**-होय. मोठ्या आनंदानें.

**सावि०**-( हर्षानें ) तर मग तें काम माझें. चलावें प्राणनाथ.

( जातात. )

स्थल..................घोर अरण्य.

**सत्यवान्—**

**पद.**

( राग कालींगडा चाल–माया ही अनिवार० )

**रम्य किती वन हें ॥ पहा गे ॥ ध्रु०॥ करावया उपकार जनांवरि॥ तरुगण किती फुललाहे॥१॥ तृषित जनांसी तृप्त कराया ॥ वाहे नद हा पाहे ॥ २ ॥**

**सावि०**–प्राणनाथ, आपण ह्मणतां ती गोष्ट खरी आहे. परोपकारासाठींच गाई दूध देतात, नद्या वाहतात, आणि वृक्ष फलद्रूप होतात.

**सत्य०**–आहाहा ! हे वृक्ष आम्रफलभारानें किती लवले आहेत आणि हिरवीगार झालेली वनभूमी नेत्रांस किती सुख देत आहे हीं ! आणि मधून मधून जाणाऱ्या चित्रविचित्र रंगांच्या पुष्पांनीं अलंकृत झालेल्या या वेली किती तरी या भूमीस शोभा देत

आहेत ! मला असें वाटतें कीं जसा कांहीं कोणी एकानें सुंदर गालिचाच पसरून ठेविला आहे.

**सावित्री**–( अंतरीं दुःखी पण बाह्यात्कारीं हर्षित असें दाखवून ) मलाही तसेंच वाटतें. आणि त्यांत पावसाच्या पाण्यानें जमिनीच्या बरोबर ठिकठिकाणीं भरलेल्या डोहांत उगवलेलीं टवटवीत कमलें फारच सुंदर दिसतात.

**सत्य०**–प्रिये, तीं सुंदर दिसतात. खरीं, परंतु तुझ्या मुखावरून त्यांना ओंवाळून टाकावीं. हें मुख-कमल पाहिलें कीं जसें समाधान होतें. तसें का या कमलांनीं होणार आहे ?

**सावि०**–( एका बाजूस दुःखित होत्साती ) अरे देवा ! या मनोहर मूर्तीच्या सुखावह सहवासाचा आज मला शेवटचा लाभ ना ? देवा, तूं काय कर-शील तें खरें.

**स०**–प्रिये, तेथें विचार कशाचा करीत उभी रा-हिली आहेस ? या घोर वनाची तर तुला भीति वा-टत नाहींना ?

**सावित्री**–प्राणनाथ, आपण माझ्याजवळ असतां मला भीति कोठून असावयाची ? पण आतां लवकरच सांजावेल त्याचें मात्र मला फारच भय वाटत आहे.

**सत्य०**–तर मग चल प्रिये. आपण या अरण्यांत जरा पुढें जाऊन त्या झाडाची लांकडें तोडूं.

**सावित्री**–प्राणनाथ, कशाला इतकें दूर जायचें होतें आहे ! हीं तोडाना जवळचींच लांकडें.

**सत्य०**–हीं कोवळीं लांकडें आपल्या काय कामाचीं ! प्रिये, पहा तो वटवृक्ष जवळच आहे. त्याच्याजवळ असलेल्या झाडांचीं लांकडें तोडून लवकरच घरीं जाऊं ह्मणजे झालें.

**सावित्री**–चलावं प्राणनाथ. पण घरीं जाण्याला फार उशीर होईल. ( दोघेंही पुढें जाऊं लागतात. सावित्री पदर सांवरून ) अगबाई ! पण वारा तरी किती जोरानें वाहत आहे हा ! आतांच मला उडवून टाकीलसें वाटतें. प्राणनाथ; चलाहो घरीं लवकर. अहो वर पहा पहा—

पद. ( राग मल्हार )

कृष्णवर्ण किति नभ हें दिसतें ॥ मन माझें बहु शंकित होतें ॥ धृ० ॥ सणणण वाहे वायु वनां-तरिं ॥ घुमत घुमत घनघोष किती तरि ॥ कड-कडते किति विज अंबरीं ॥ जावें मजला गृहिं गमतें ॥ १ ॥

स०–( वर पाहून ) आकाश साभ्र झालेलें दिसत आहे तर खरें. पण प्रिये, तूं भितेस कशाला ! गर्जना करणारे मेघ क्वचित्च वृष्टि करितात. पहा तें इंद्र-धनुष्य.

सावित्री–अहाहा ! किती सुंदर दिसत आहे तें !

सत्य०–प्रिये, सायंकाळीं पडलेल्या या इंद्रधनुष्या-वरून मला असें वाटतें कीं आज पहाट होईतोंपर्यंत पर्जन्यवृष्टि होण्याचा संभव नाहीं.

सा०–बरं तर प्राणनाथ जशी आपली इच्छा. चलावं पुढें. ( दोघेंही पुढें जातात. सत्यवान् फांटीं तोडूं लागतो. सावित्री फुलें गोळा करूं लागते, इत-क्यांत सत्यवानाच्या मस्तकावर एका वृक्षाची सुकलेली

फांदी पडते, तेणेंकरून तो किंचित् मूर्छेत पडलेला असतां )

**सत्य०**–प्रिये, तूं आहेस कुठं ? इकडे ये पाहूं.

**सावि०**–( धांवत त्याच्याजवळ जाऊन व त्याला बसता करून ) अरेरे ! हें काय झालें ! कपाळ तरी एकाएकीं सुजून किती वर आलें आहे हें ! ( सत्यवानाला मूर्छना येत आहे असें पाहून त्यास सांवरून ) प्राणनाथ ! प्राणनाथ !

**सत्य०**–प्रिये, तूं धैर्य सोडूं नको. मी अंतर्यामीं सावध आहें. परंतु मस्तक फारच दुखत आहे म्हणून मला अगदीं चैन पडत नाहीं. माझ्यानें बसवत नाहीं, जरा पडून पाहातों.

**सावि०**–निजायचें होतें तर प्राणनाथ, या माझ्या मांडीचें उसें करून या नवीन उगवलेल्या मऊ गवतावर, म्हणजे वेदना दूर होतील. ( सत्यवान् निजतो सावित्री त्याचें हळू हळू मस्तक चेपते. ) आतां अंमळ बरें वाटतें का प्राणनाथ ! कीं जरा जोरानें मस्तक चेपूं !

स०—नको प्रिये, तुझे हात दुखतील.

सावि०— कांहीं दुखावयाचे नाहींत. ( मस्तक चेपीत असतां ) प्राणनाथ, आतां वेदना कांहींशा कमी झाल्या का ?

सत्य०—होय प्रिये, आणि आतां झोंपही लागेलसें वाटतें. तूं स्वस्थ ऐस. कांहीं चिंता करूं नको.

सा०—( सत्यवानास निद्रा लागलेली पाहून व दुःखाचा उसासा टाकून ) हाय ! आतां यांतून काय निपजेल कोण जाणे ! ( थांबून ) एक प्रहर रात्र गेली ( रडत ) पण नारदमुनींनीं सांगितलेली हीच रात्र आणि हीच वेळ ! काय परमेश्वर घडवील तें खरें. ( घाबरून ) अगबाई ! पण इतक्यांत अंग थंडगार कां बरं लागूं लागलें इतकें ? ( रडत ) देवा आतां मी काय करूं ?

गरबा. ( चाल—मारारे स्वामी० )

**कृपाळा करुणा करीं श्रीहरी ॥ जगदीशा संकट माझ हरीं ॥ ध्रु० ॥ तुजवीण कवण रमाकांता ॥**

**असे माझ्या प्रिय नाथा त्राता ॥ निराधार बनीं वनिता ॥ किती पहासि अंत माझा तरी ॥१॥**

( इतक्यांत दक्षिण दिशेस एक मोठा भयंकर आवाज होतो तो ऐकून व प्रकाश पडलेला पाहून साश्चर्य भयग्रस्त होत्साती )–पण बाई, हा दक्षिण दिशेकडून येणारा प्रकाश कशाचा ! ( रडत ) कांहीं दुश्चिन्ह आहे यांत संशय नाहीं. ( इतक्यांत हातांत पाश घेऊन यमराज सत्यवानासन्निध येऊन उभे राहतात. त्यांस पाहून सावित्री पतीचें शरीर भूमीवर ठेवून हात जोडून त्यांच्या समोर उभी राहून मोठ्या विनयानें ) महाराज, आपण कोणी देवता आहां. कारण हें आपलें स्वरूप मनुष्यासारखें नाहीं. आपण कोण आहां ?

**यम**–सावित्री, तूं महापतिव्रता आहेस, अशा साध्वीशींच बोलण्याचा प्रसंग यावा. सुशीले, मला यमधर्म ह्मणतात.

**सा०**–धर्मराज, मी आपले चरणीं वंदन करितें.

( नम्रतेनें ) पण महाराज, आपण इथें कशाकरतां आलां आहां ?

**यम**–तुझ्या पतीचे प्राण हरण करण्याकरितां मी इथें आलों आहें.

**सावित्री**–( रडत ) हायरे देवा ! काय हें एका-एकीं संकट मजवर ! भगवंता, मनुष्यांचे प्राणहरण करण्याकरितां आपण आपले दूत पाठवीत असतां असें मीं ऐकिलें आहे. आणि आज तर आपण स्वतांच आलां हें कसें ?

**यम**–तुझा पति पूर्ण मातृभक्त असल्यामुळें त्यास माझ्या दूतांकडून नेवविणें योग्य नाहीं ह्मणून मी स्वतां आलों आहें. ( सत्यवानावर पाश टाकून त्याचे प्राण हरण करतो. )

**सावित्री**–( मोठ्या आक्रोशानें ) हाय हाय ! देवा ! काय प्रसंग हा ! ( मूर्च्छागत होत्साती जमि-नीवर पडते. मूर्च्छा सावरून व उभी राहून ) भगवंता–( रडत )

पद, ( चाल—आजि झाला० )

मज पदरीं घ्या सदया सुरकुलदीपा नश्वरस्वरूपा ॥ हरणें गा मम परितापा ॥ जशि शून्य दिसे चंद्रविहीना रजनी ॥ तशि ही गृहिणी ॥ कांताविण केविलवाणी ॥ मज मानोनी आपुलि पालक दुहिता ॥ श्री भगवंता ॥ पतिसंगें न्या मज ताता ॥

यम—( तिरस्कारानें ) अग, हें काय ह्मणतेस ? पतिसहवासाची आस धरून उगीच जिवास त्रास करून कां घेतेस ?

सावित्री—देवा, मजवर दया करा. ही दीन अबला आपल्या पायां पडत आहे. ( पायां पडते. )

यम—( मागें सरून रागानें ) ऊठ आणि फीर माघारी.

पद. ( चाल—अभाग्याच्या घरीं० )

व्यर्थ कशाला रडशी पडशी चरणांवरि रुळ-शी ॥ पतिसह न्या मज वाणी ऐशी अघटित कशि वदसी ॥ जिवंत प्राणी नेला कोणीं माझ्या

सदनासी ॥ सत्या स्मरुनी सांग मला गे जरि ठाउक तुजसी ॥ कांतारीं कां कांतकलेवर एकाकी त्याजिसी ॥ जा तेथें जा जा वेगें जा कां मज श्रमवीसी ॥ १ ॥

**सा०**—( रडत ) हाय हाय ! आपण सर्वशक्तिमान् असतां असें हें काय ह्मणतां ! आतां मी कोणाला शरण जाऊं नि कोणाला दुःख सांगूं! नका हो माझा नि माझ्या पतीचा वियोग करूं ? माझे प्राण ध्या—ध्या—खचित घ्या.नाहींतर मला माझ्या पतीचें जीवदान तरी द्या. मी आपणाला शरण आहें. ( पायां पडते. )

**यम**–( रागानें ) छे छे छे ! असें कधींही घडणार नाहीं. हे सती, तूं जा माघारी; आणि पतीची धर्मयुक्त क्रिया करवून त्याच्या ऋणापासून मुक्त हो.

**सा०**( रडत ) अरेरे ! हें मी काय ऐकतें ! देवा–

**पद**. ( चाल–नच सुंदरि० )

ह्मणतां जरि सती मजशी ॥ जाऊं पति त्यज्ञुनि

कशी ॥ धर्मातें अनुसरती होय हि कृति कैसी ॥ ॥ धृ० ॥ अर्धांगी हाय सती ॥ वदतो बुध श्रुति-स्मृती ॥ जा सती ॥ अशी भलती ॥ वदलां कां मज उक्ति ॥ सोडावें निज पतिला नीति नसे ऐसी ॥ ह्मणतां ॥ १ ॥

**यम**—(जरा शांत होऊन ) हे महापतिव्रते सावित्री, तुझ्या या धर्मयुक्त भाषणानें माझें मन प्रसन्न झालें आहे; परंतु—

पद. ( चाल —उदासी कां गे० )

जाणुनी जगतीनियमांसी ॥ कां तनये अशि करणी करण्या विनवीसी मजसी ॥ कशाला पति-आशा धरिसी ॥ सरलासे अनुबंध ह्मणुनियां गोष्ट घडे ऐसी ॥ बद्ध कां होसि मोहपाशीं ॥ व्यर्थ कशाला संकटजलधीं मजसीं बुडवीशी ॥

**सावित्री**-( रडत ) हे देवाधिदेवा जगताचा जीवात्मा जो सूर्यनारायण त्याचे आपण पुत्र आहां. ज्याप्रमाणें पित्याची संपूर्णांवर समानदृष्टि आहे त्या–

प्रमाणें आपलीही आहे. ह्मणून आपणांला लोक यम- धर्म असें ह्मणतात. सर्व लोकांवर अनुग्रह करावा हा साधूंचा धर्म आहे. ह्मणून परोपकारासाठीं त्यांना कितीही संकटें सोसावीं लागलीं तरी ते तीं मोठ्या आनंदानें सहन करतात. भगवंता—

दिंडी.

**वृक्ष तपति परि देति परां छाया ॥**
**सुकति ग्रीष्मीं नद तृषित शांतवाया ॥**
**दीन दुबळ्यातें आपुले ह्मणाया ॥**
**होति साधू अवतीर्ण धर्मराया ॥**

**यम**–किती धर्मयुक्त भाषण तुझें हें ! साध्वी, तुझी मला फार दया येते. परंतु मी काय करूं ? माझ्या- बरोबर येण्याचे तूं निरर्थक श्रम कां घेतेस ?

**सावित्री**–दयाळा, आपण सत्पुरुष आहां ह्मणून आपल्या हृदयांत दया असणें हें तर स्वाभाविकच आहे. ज्यांच्या चित्तीं दया त्यांची संगती घडली असतां ती हितकारक होते असें शास्त्र बोलतें. तर मग आपल्यासारिख्या सत्पुरुषांचा समागम मला

झाला असतां माझे श्रम कसे बरें निष्फल होतील ? आणखी—

**यम**—आणखी काय ह्मणतेस वत्से ?

**सावित्री**—हे देवा, ज्याप्रमाणें चंदनवृक्ष आपणांस कापणाऱ्या कुऱ्हाडीलाही आपला सुगंध देतो त्याप्रमाणें सत्पुरुषांना शत्रु जरी शरण आले तरी ते त्यांच्यावर दया करितात. ( रडत ) आणि मी तर आपली शरणागत आहें. मजसारख्या दीनावर आपण दया करालच.

**यम**—( हर्षानें ) चतुरे सावित्री—

**पद.**

( चाल—जानत प्रीत रीत रघुराय० )

**कितितरि लीन दीन मधु वाणी गे ॥ मोहातं वश होते मन दुहिते ॥ सत्य सती भनिं मानीं गे ।धृ०॥ इष्ट तुला देवोनि मला करुं तुष्ट गमें वरदानीं ॥ परि पति जीवविना वर मागें धन्य धन्य तूं अवनीं ग्रे ॥ १ ॥**

सा०—(स्वगत) आतां काय वरं मागूं ? (थांबून )

सुचलें. ( उघड ) भगवंता, आपण प्रसन्न झालां तर कृपा करून माझ्या सासऱ्याचें अंधत्व दूर करा.

**यम**–वत्से, माझ्या आशीर्वादेंकरून तुझ्या सासऱ्यास सूर्यासारखी दिव्य दृष्टि प्राप्त होईल. जा आतां फिर माघारी.

**सावित्री**–( रडत ) ताता, या आपल्या अनाथ कन्येला अशा अंधाऱ्या रात्रींत घोर अरण्यांतून आपण अशी एकटी परत कशी बरं पाठवितां ?

**यम**–एकटी ! अगे, तूं मजसंगें येण्यास निघालीस त्या वेळेस तुझ्याबरोबर कोण होतें ?

**सावित्री**–महाराज, आपण तर मजबरोबर होतांच ( रडत ) आणखी माझी जिवलग मैत्रीण जी आशा तीही मजबरोबर होती, पण आतां ती सुद्धां मला दुर्दैवेंकरून नाहींशी झाली आहे; तर मग मी एकटी कशी बरं जाऊं ?

**यम**–वत्से तूं आपल्या वाक्चातुर्यापाशीं मला अधिकाधिक बद्ध करित आहेस. असो. परंतु तुला

चालतां चालतां फारच श्रम झाले आहेत. विश्रामासाठीं आश्रमीं परत जा. तूं फारच दुर आलीस.

**सावित्री**—कृपाला, माझे पति हेच माझें विश्रांतिस्थान व तेच माझा आश्रम. पुनः माझें मन पतीपासून दूर नाहीं, व तें कधींहीं दूर जात नाहीं, ह्मणून मी माझ्या आश्रमापासून दूर आलें आहें असें नाहीं, पण मी त्यांच्याजवळच आहें. तर मग मला श्रम कोठून होणार !

**यम**—अहाहा ! सावित्री, पूर्वीं कोणाच्याही मुखांतून न ऐकिलेलीं अशीं हीं तुझीं वचनें श्रवण करून माझ्या चित्तास अधिकाधिक आनंद होत आहे. ह्मणून पतीच्या जीवित्वावांचून दुसरा एकादा वर मागून घे.

**सावित्री**—करुणानिधे, माझ्या सासऱ्यांचें गेलेलें राज्य पुनः त्यास प्राप्त व्हावें असें मी इच्छितें.

**यम**—माझ्या प्रसादेंकरून ही तुझी इच्छा परिपूर्ण होईल. जा आतां. फीर माघारी. नको येऊं मजबरोबर. मार्ग बिकट आहे.

**सावित्री**–धर्मराज, मार्ग बिकट असो किंवा सुलभ असो, मी आपल्याबरोबर येणारच.

**यम**–कां बरें ?

**सावित्री**–एकतर साधूचा समागम होणें फार कठीण. त्यांत माझें पुण्य ह्मणा किंवा माझ्या पूर्वजांचें पुण्य ह्मणा, त्या पुण्यानें आपल्यासारिख्या पवित्र साधूंचा अनायासें मला समागम झाला तो सोडून जाणें म्हटले म्हणजे घरीं आलेल्या कामधेनूला हांकून दिल्यासारखें होणार नाहीं का ? तशांत माझी गती भर्ता आहे. ज्या स्थलीं आपण त्यांस न्याल तेथें मी निश्चयेंकरून येईन. महाराज, पतीला सोडून न जाणें हा स्त्रियांचा धर्म होय. आपण धर्मराज असतां मला स्त्रीधर्माचें उल्लंघन करण्यास कसें बरं सांगतां ?

**यम**–हे धर्मपरायण सावित्री—

साकी.

**निजपतिवरुतीप्रेमविमलतवबघुनिमोदमनिंजागे**
**पतिजीवित्वावीण शुभांगे मागें वर तुजा गे ॥**
**जा गे फिर मागें ॥ माझ्या येसि कुठें मागें॥१॥**

**सावित्री**–देवा, माझ्या पित्याला एकही पुत्र नाहीं. त्याला आपल्या वरप्रसादेंकरून इंद्रासारिखे प्रतापी शंभर पुत्र होवोत.

**यम**–जा. तुझी ही वाणी सत्य होईल. वत्से, तुझी ही परोपकारबुद्धि व औदार्य पाहून मला अत्यंत आनंद होत आहे. अगे, तूं दुसऱ्यासाठीं वर मागून घेतलेस परंतु स्वतांसाठीं कांहींच मागितलें नाहींस. तर पतिप्राणांवांचून एखादा स्वतांसाठीं वर मागून घे–घे–घे, पहा, हा धर्मराज तुला प्रसन्न आहे.

**सावि०**–( रडत ) हे भगवंता—

पद ( चाल–माझा कृष्ण देखिला० )

**नलगे पतिविण कांहिं मला ॥ सदया यमराया ॥ धृ० ॥ दुःसह वैधव्याचा भार ॥ कशि ही वाहिल अबला नार॥बुडला माझा इह संसार ॥ नचि आधार कवणाचा ॥ १ ॥ पतिवर होय सतीचा प्राण ॥ तोची सकल सुखाची खाण ॥ द्या मज सौभाग्याचें दान ॥ दीननिदान पाहुं नका ॥ २ ॥**

**यम**–हं तुझें करुणामय भाषण माझ्या हृदयाचें विदारण करतें. हे सती—

दिंडी.

**बद्ध झालें मंच्चित मोहपाशीं ॥**
**गमे द्यावें जीवित्व त्वत्प्रियासी ॥**
**परी मागे त्यावीण दुजें कांहीं ॥**
**तुला द्यायातें सिद्ध असें पाहीं ॥**

**सावित्री**–देवा, मजसाठीं मी आपणापाशीं कांहीं मागावें आणि आपण तें मला द्यावें असा जर आपला निश्चय खरोखरींच आहे तर हें द्या कीं होवोत मला सत्यवानापासून शंभर पुत्र.

**यम**–तथास्तु, तूं बलवीर्यशाली शतपुत्रा होशील. आतां तरी मागें फिरशील ?

**सावित्री**–देवा, आतां मी मागें कशी बर फिरूं ? जेथें माझे पती जातील अथवा त्यांस कोणी नेईल त्यांच्या पाठोपाठ मला आतां तर आलेंच पाहिजे.

**यम**–मोठेंच आश्चर्य !

**सावित्री**–त्यांत आश्चर्य कशाचें महाराज ?

पद ( चाल—खरी झाली दृष्टि० )

यमराया विनंति माझी आपणाला मानली ॥
शतपुत्रा होसि वाणी वर वदली आपुली ॥
नचि मिथ्या साधुवाचा झालेली ऐकिली ॥
पतिविणें कवण साध्वी मातृत्वा पावलीं ॥

**यम**—गोष्ट खरी. आतां काय करूं ?

**सावित्री**—महाराज, आतां कशाला करितां विचार ? साधूंचा समागम कधीं निष्फळ झालेला ऐकिला आहे का ? भगवंता—

( रडत ) पद ( चाल—कंथबिन० )

पतीविण राहि कसा मम प्राण ॥ हारपलें देहभान ॥ ध्रु० । कांत वैभव प्राणपती ॥ निर्धन वा धनवान ॥ होय विसांवा हृदयाचा ॥ तोचि तये भगवान ॥ १ ॥

**यम**—धन्य धन्य ! साध्वी, तूं जशी पतिव्रता तसीच चतुर आहेस. माग, तुला वाटेल तो वर माग.

**सावित्री**—महाराज, आपण समर्थ आहां. आतां कशाला विलंब करितां ?

( सदरील पदाचें दुसरें कडवें )

**सत्य कराया वर आपुला ठेवा मनिं अभिमान॥**
**जीवदान द्या पतिराया कां करितां अनमान॥प०॥**

**यम**—अहाहा ! तूं आपणांस त्रिभुवनीं धन्य करून घेतलेंस ! असो. हे पहा सती, मी तुझ्या पतीचे प्राण पाशांपासून मुक्त करितों. ( प्राण पाशांपासून मुक्त करितो. ) सुशीले, ऐक.

पद. ( मालकंस )

**सार्थक केलें त्वां जन्माचें ॥ पाळुनियां व्रत पतिसेवेचें ॥ ध्रु० ॥ जोंवरि रविमंडल जगतीं ॥ राहिल स्थिर तव गुणकीर्ती ॥ उभय कुलें तव उद्धरती ॥ फल हें तुझिया पुण्याचें॥ १ ॥ पतिसह अखंड चतुःशतें ॥ जिवंत असशिल पतिव्रते ॥ शत सुफलें तव उदरलते ॥ सावित्री नाम वंशाचें ॥ २ ॥**

**सावित्री**—हा आपला आशीर्वाद मी शिरसावंद्य करितें.

**यम**—वत्से, आणखी ऐक.

( वरील पदाचें तिसरें कडवें )

ज्या ललना भावें भक्तीं ॥ वटसावित्रीव्रत करिती ॥ तत्पति–अपमृत्यू टळती ॥ सत्य सत्य वदतों वाचे ॥ ३ ॥

**सावित्री**–भगवंता, मी आपले चरण वंदन करितें.

**यम**–शतपुत्रा, अखंडसौभाग्यवती भव. जा आतां सुखानें संसार कर. ( यम जातो. )

**सावि०**–( आनंदानें ) साकी.

वाटे येथुनि निकट पतीच्या उडुनि खगापरि जावें डोळे भरुनी पाहुनि पतिला प्रेमालिंगन द्यावें ॥ इच्छित साधियलें ॥ पूर्वजपुण्य फळा आलें ॥

## प्रवेश ३ रा.

स्थल........................घोर अरण्य.

**सत्य०**–( झोंपेंतून उठून बसलेला असतां ) गाढ निद्रा लागल्यामुळें मस्तकशूळ अगदीं नाहींसा झाला. परंतु रात्र कशी व केव्हां निघून गेली हें मला कळलें

देखील नाहीं. ( वर पाहून ) अहाहा! अरुणोदय समयीं हा मंद सुगंध शीतल वायु जिवास किती तरी सुख देत आहे! आणि भक्षार्थ इकडे तिकडे उडत असलेले सुंदर पक्षी, हे प्रिये–( मागें वळून सावित्रीच्या स्कंधावर हात ठेवण्यास जातो परंतु ती दृष्टीस न पडल्यामुळें विस्मित होत्साता उठून ) अरे, माझी प्रिया कुठें आहे? ती कोठें बरें गेली असावी? प्रिये, प्रिये—( इकडे तिकडे तिला शोधूं लागतो ) अरे, पण मी जागा तर चुकलों नाहींना? नाहीं, हाच तो वटवृक्ष आणि याच जागीं मी निजलों होतों. पुनः माझी पूर्ण खात्री आहे कीं, मी दुःखावस्थेंत निद्रिस्त असतां मला टाकून जाणारी ती स्त्री नव्हे; तर मग ही गोष्ट घडून आली कशी? खचित तिला एखाद्या वाघानें ओढून नेली असावी. हाय! हाय! प्रिये, तूं मला नाहींशी झालीसना! अगे, ज्या वेळेस त्या दुष्ट पशूनें तुजवर घाला घातला त्या वेळेस तूं मला जागृत कां केलें नाहींस? प्रिये, तुझ्या संकटसमयीं

मी तुला शेवटीं उपयोगीं पडलों नाहींचना ? धिक्कार असो मला आणि या माझ्या विजयी धनुष्याला. ( धनुष्य जमिनीवर टाकून )

पद ( चाल–सदाशिवधुंदी० )

**कुठें तुज पाहूं ॥ कसा जगिं राहूं ॥ विरह तव साहूं ॥ धृ० ॥ काय वदूं मी प्रिय जननीला ॥ वदन कसें तिज दावूं ॥ कुठें तुज पाहूं ॥ १ ॥**

( सावित्री एका बाजूस प्रवेश करिते )

**सावित्री**–( पतीला दुःखांत पाहून ) हीच वेळा प्राणनाथाला भेटायची. प्राणनाथ ! धांवत जाऊन ( पतीस प्रेमालिंगन देते. )

**सत्य०**–अहाहा ! प्रिये, मृताला संजीवनी तसें तुझें हें समयोचित आगमन होय. प्रिये, तूं एवढा वेळ कुठें होतीस ?

**सावि०**–प्राणनाथ, मी आपल्याच कार्यासाठीं गेलें होतें पण आतां वेदना कमी झाल्या ना ? बरं वाटतं का ?

**सत्य०**—होय प्रिये, मला आतां बरें वाटतें. परंतु मी गाढ निद्रेंत असतां एक महापराक्रमी भयंकर पुरुष माझ्या दृष्टीस पडला, तेणेंकरून माझ्या जिवाला थोडीशी अस्वस्थता प्राप्त झाली आहे.

**सावि०**—दिसला असेल एखादा तसला स्वप्नांत पुरुष. आपण स्वस्थ असावयाचें होतें. आश्रमीं गेल्यावर मी आपणाला सर्व गोष्ट सांगेन आणि मामंजीला विचारून या दुष्ट स्वप्नाची शान्तिही करवीन.

**सत्य०**—चल तर प्रिये आपण आश्रमीं जाऊं.

**सावि०**—ठीक आहे प्राणनाथ. पण ठेवितें मी इथेंच हें फळमूलांनीं भरलेलें पात्र. कुऱ्हाड मात्र घेतें.

**सत्य०**—नको. ती दे माझ्याजवळ.

**सावि०**—प्राणनाथ, आपल्याला फार श्रम होतील कारण आपण नुकतेच दुखण्यांतून उठलां आहां म्हणून राहूं द्या ही कुऱ्हाड मजपाशींच आणि आपणाला चालण्यास शक्ति नाहीं म्हणून माझ्या स्कंधावर हात ठेवून हळू हळू चालायचें होतें.

**सत्य०**–( सावित्रीच्या स्कंधावर हात ठेवून ) अहाहा !

पद. ( असावरी )

**ऐसी तव विमला प्रिति सुककारी ॥ किति हृदया विकाशि हरुषे मम प्राणप्रिये सुकुमारी ॥ ॥ ध्रु० ॥ निजकांतसुखीं सुखि दुःखिं अति विकल मानसिं भारी ॥ होई जगत् शून्य जिला पतिविण कांते सती तीच जगिं नारी ॥ १ ॥**

**सावि०**–प्राणनाथ, हा सर्व आपल्या चरणांचा प्रताप आहे. चलावें. सासूबाई आणि मामंजी आपल्यासाठीं अगदीं चिंतातुर झालीं असतील.

**सत्य०**–मलाही तसेंच वाटतें. चल प्रिये.

**सावि०**– ( चालत असतां ) अहाहा ! अगदीं उजाडलें, कितीतरी सुंदर देखावा हा ! आणि केवढी तरी ही सुखकारक वेळा !

पद ( चाल–कर्पूरगौर नंदीवरी० )

**किती तरी वाटे हा सुखद समय तोष मना जो करीं ॥ ध्रु० ॥ दुःखतमा निरसाया ॥ सुखक-**

मला विकसाया ॥ भाग्यरवी ये उदया ॥ मत्प्रपंच-अंबरीं ॥ १ ॥

( जातात. )

**प्रवेश ४ था.**

स्थल..............ऋष्याश्रम.

( द्युमत्सेन शैब्यासह प्रवेश करितो. )

**द्युमत्सेन**–( दुःखित होत्साता ) वत्सा सत्यवाना ? वत्से सावित्री ! तुम्ही कुठें आहां ? कुठें आहां ! मला टाकून कुठें गेलांत ? हाय? हाय ? तुमच्या शोधार्थ आम्हीं उभयतां सारी रात्र वनांत उपवनांत हिंडत आहों, परंतु अद्याप तुमचा शोध मला कोठेंही लागत नाहीं ! आतां मी काय करूं ! अरेरे, तुम्हांवांचून हें शून्य झालेलें जग पहाण्यास मला ही दिव्य दृष्टि आली तरी कशाला ? मी अंधच कां राहिलों नाहीं ! हाय हाय ! आतां हें दुःख मी वृद्धापकाळीं कसें सोसूं.

**शैब्या**–वत्से सावित्री, बाळा सत्यवाना, तुम्ही कोठें असाल नि तुमची अवस्था काय झाली असेल !

( गौतम, दालभ्य, धौम्य, सुवर्चस ऋषी प्रवेश करितात. )

**दालभ्य**–स्वस्थ ऐस, राजा स्वस्थ ऐस—

**पद** ( असावरी. )

**विकल मना करिसी कशाला ॥ धैर्य धरोनी महा नृपाला करिजे शांत मनासी ॥ध्रु०॥नेणसि कैसा प्रभव सतीचा अज्ञाना कां धरिसी ॥ होय अजित जी सकल जगाला व्यर्थ कशाला भीसी ॥ १ ॥**

**द्युमत्सेन**–आपण सांगतां ती सर्व गोष्ट खरी, पण आतां धैर्य धरून मनाची शान्ति होईलसें वाटत नाहीं. हा वत्सा ! हा ! वत्से सावित्री !

**धौम्य**–राजा, तूं स्वस्थ ऐस. दुःखाचा त्याग कर. पहा, मी माझ्या तपश्चर्येच्या बलेंकरून तुला निश्चयःपूर्वक असें सांगतों कीं सती सावित्री व सत्यवान् सुखरूप आहेत. तशांत या माझ्या वचनानें तुझी संशयनिवृत्ति होत नसल्यास हे ब्रह्मचारी

त्रिकालज्ञानी गौतमऋषी तुला त्यांचा वृत्तांत कथन करितील तो चित्त देऊन श्रवण कर म्हणजे तुझ्या जिवाला समाधान वाटेल. राजा, यांची कीर्ति जगत्प्रसिद्ध आहे

**गौतम**—राजर्षे, जरी मी इतक्य स्तुतीस पात्र नाहीं तरी तूं माझें वचन सत्य मान आणि संशयांत पडूं नको. अरे, तीं तुला लवकरच भेटतील, परंतु ज्या कारणानें त्यांस आश्रमीं परत येण्यास इतका विलंब झाला आहे तें कारण असें कीं,

श्लोक ( भैरवी. )

शाखा शुष्क द्रुमाची पतिशिरिं पडतां मूर्च्छना ये तयाला ॥ स्वांकीं त्याला सुशीला निजवुनि मग ती आठवी दीनपाला ॥ ये तत्स्थानीं निहंता हरि तदसु-करीं टाकुनी पाशमाला ॥ युक्तीं भक्तीं सदुक्तीं अ-कळि मग सती मोहपाशीं यमाला.

**शैब्या**—काय मुनिराज, माझ्या बाळावर त्या घोर अरण्यांत असला कठिण प्रसंग आला होता ? अग बाई! मला फार भय वाटतें.

**गौतम**—भयाचें कारण आतां कांहींच उरलें नाहीं तीं पहा उभयतां इथेंच येत आहेत.

( सावित्री व सत्यवान् प्रवेश करितात. )

**द्युमत्सेन**—पुत्रा, तुला येण्यास इतका विलंब कां बरं झाला ?

**सत्य**०ताता, आज माझी चित्तवृत्ति अगदीं भयग्रस्त झाली आहे.

**शैब्या**—कां बरं तुझ्या मनांत काय वागत आहे बाळा ?

**स०**—आई—

होरी. ( राग—काफी. )

**नाहिं चैन जिवाला ॥ जननी गे ॥ चिन्ता अडलि मनाला ॥ ध्रु० ॥ निद्रित असतां प्रियजायांकीं ॥ पाहीं स्वप्नीं यमाला ॥ १ ॥**

**दालभ्य**—हे महापतिव्रते सावित्री, घोर अरण्यांत तूं फुलें वेंचीत असतां व तुझा पति लांकडें तोडीत असतां एकाएकीं एका सुकलेल्या झाडाची फांदी

त्याच्या मस्तकावर पडल्यामुळें त्यास मूर्च्छना आली त्या वेळेस त्यास आपल्या मांडीवर निजवून ईश्वराची प्रार्थना करीत बसली होतीस त्या समयीं तेथें अकस्मात् यमराज प्रगट झाले व त्यांनीं आपला पाश तुझ्या पतीवर टाकून त्याचे प्राण हरण केले त्या प्रसंगीं तूं आपल्या सतीप्रभावाच्या बलानें यमधर्मास मोहपाशांत बद्ध करून तुझ्या पतीस जिवविलेंस व दुसरेही वर त्यांजपासून मागून घेतलेस तें तुझ्या पतीस सांगून त्याच्या मनाचें शांतवन करण्यास कां उशीर लावतेस ?

**सावि०**–महाराज, हे गौतमऋषि त्रिकालज्ञानी आहेत आणि त्यांस सर्व कांहीं विदित आहे म्हणून तेच सर्व सांगतील तर बरं होईल.

**गौतम**–नाहीं, तसें होणार नाहीं. तुझ्याच मुखानें ती गोष्ट ऐकावी अशी आम्हां सर्वांची इच्छा आहे.

**सावि०**–जशी आपली इच्छा. मुनिराज—

श्लोक. ( भैरवी. )

दिव्या दृष्टि प्रभूता गतनृपपदही माझिया सासऱ्यातें ॥ इंद्रा जैसे प्रतापी सुत शत जनका तेविं या तत्सुतेतें॥ सौभाग्याचीच भिक्षा मजशि करुनियां जीवदान प्रियातें ॥ संपादीं मी प्रयत्नें वश करुनि यमा पांच ऐशा वरांतें ॥

गौतम–अहाहा ! सती, तूं धन्य होस.

पद. ( भैरवी चाल–अन्न तोरे० )

जगिं नोहे नारी जाण सती गे, जगिं नोहे नारी धन्यतम तुजसम गुणवती, नाहिं, नाहिं सुभगा दुसरी ॥ धृ० ॥ चरित तुझें जिवा किती तरि मानें ॥ आणि जाण मोदें सुखजलधिं लहरी ॥ १ ॥

सावित्री–महाराज, हा सर्व प्रताप व महिमा यांच्या या-चरणरजांचा आहे.

पद. ( भैरवी चाल–घन वर्षाव० )

महिमा कांतपदांचा ॥ मुनि हा ॥ नोहे या अबलेचा ॥ मुनि हा महिमा ॥ ध्रु० ॥ पतिसेवा करि अबला प्रबला ॥ तोचि तग्रे पथ भव तरण्याचा ॥ १ ॥

**द्युमत्सेन**—शाबास मुली शाबास ! अरे पण हा दुंदुभीचा ध्वनि कोठून येत आहे ? कोणी शत्रु तर आला नाहींना ? पुत्रा, धनुष्य लवकर सज्ज कर पाहूं कसें तें !

**गौतम**—नको नको तें धनुष्य सज्ज करायला. राजा, अरे हा जो लोकसमुदाय येत आहे तो तुझा शत्रु नाहीं, पण तुझ्या प्रधानानें तुझ्या शत्रूस मारून तुला राज्यावर स्थापन करण्यासाठीं बोलाविण्यास पांठविलेली तुझीच प्रजा आहे.

**सत्य०**—अहाहा ? केवढा सुदिन हा !

( प्रजा प्रवेश करिते. )

**प्रजा**—महाराज चलावं शाल्वनगरवासी प्रधानादि प्रजा आपली वाट पहात बसली आहे.

**द्युमत्सेन**—मुनिराज, या प्रसंगीं आपल्या आज्ञे-प्रमाणें वागेन.

**गौतम**—सुखानें जावें अशी माझी आज्ञा आहे.

द्युमत्सेन–आपली आज्ञा मान्य करितों. चलावें. आपणही मजसमागमें यावें.

गौतम–अहाहा! काय सती सावित्रीचा प्रताप हा

ऋषिकुमार–( आनंदानें )

गायन.

( चाल–मंद मंद विचराति वायु० )

गागे गागे गा गा रसने गा ॥ साध्वी प्रीति-कीर्ति सुमनें गा ॥ साच साच शुभ दिन हा । जय जय शुभकर गा गा गा ॥ ध्रु० ॥ दावि जगता सावित्री । पथ गा किति वाटे हितकर हा ॥ मंगलदायक सतीगुणां पतिसह गुणवती गा गा गा ॥ १ ॥ कांते व्रत नचि दूजें पतिविण; माना प्रभु वर प्राणेशा ॥ आणा निजमनीं सावित्री । वागा तिजसम संसारीं ॥ स्तुत्य सतीसद्गुण सारे । पुण्यें दिपविती देवेशा ॥ तद्गुण बुधजन परिसुन निशिदिन तननन तननन गा गा गा ॥ २ ॥

गौतम–सतीमहिमा जितका वर्णावा तितका थोडाच

साकी.

वर्णन करण्या सतीचरित्रा मम वाणी नांचि शक्ता ॥ होय जयेची सकल जगावरि देवावरिही सत्ता ॥ जाणा-प्रबल सती ॥ स्मरुनी सेव्य दत्तमूर्त्ति ॥

( सर्व जातात. )

---

प्रवेश पांचवा.

स्थल:...........................शाल्वदेश. राजमंदिर.

( द्युमत्सेन सिंहासनारूढ होतो. मंगल वाद्यें वाजूं लागतात. पुष्पवृष्टि होते. द्युमत्सेन व सत्यवान् ऋषींस वंदन करितात.

सर्व ऋषी०–राजा तुझें कल्याण असो !

दिंडी.

धन्य वाटे दिन आज धन्य साचा ॥
धन्य महिमा हा सतीचरित्राचा ॥
दयामिश्रितसा न्याय राष्ट्र देखो ॥
तुझें सारें जग कीर्तिचिन्ह रेखो ॥

**गौतम**—आजचा हा सुदिन, हे राजा तूं या सतीसावित्रीच्या सतीप्रभावामुळें पाहत आहेस. हा पातिव्रत्याचा प्रताप होय. ह्मणून, ( राजसभेंतील स्त्रियांस अनुलक्षून ) अहो कुलीन स्त्रियांनो—

तराणा. ( चाल—तदरदानी० )

**सतत रत रहा पतीचरणीं ॥ व्हाल अवनीं धन्य रमणी ॥ सतत० ॥ पतिच अखिल धन संपदा ॥ अति सुखदा ॥ प्रीति संपादा ॥ नांदा सौख्यें संसारीं या ॥ बोले ही साधूवाणी ॥ सतत० ॥**

समाप्त.